ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

जुलै २०१०

मूल्य १० रुपये

## आंतरराष्ट्रीय फूटबॉलमधला मराठमोळा झंझावात!



भीमराव देशमुख




RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011

RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

## 'अंधश्रद्धा निर्मूलन : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम' पुस्तकाचे प्रकाशन




प्रकाशनसमयी अरुण जोशी, लेखक संदीप जावळे, युवराज मोहिते, प्रतिमा जोशी आणि लक्ष्मण माने


महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
पुरस्कारप्राप्त 'डायरी' या पुस्तकाची
दुसरी आवृत्ती प्रसिद्ध होत आहे!

# डायरी

**प्रवीण बर्दापूरकर**

मूळ किंमत १८० रुपये
सवलतीत ११० रुपये


'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली'करता जयमल्हार प्रिंटिंग प्रेस, २१७, आशीष इंडस्ट्रियल इस्टेट, दादर (प) येथे छापून ग्रंथाली, द्वारा इंडियन एज्युकेशन सोसायटीची महात्मा फुले कन्याशाळा, दादर (प), मुंबई ४०००२८ येथे प्रकाशित केल

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# रुची

**जुलै २०१०**
**वर्ष ३० वे, अंक सातवा, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
या अंकाचे संपादन : **दिलीप चावरे**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, महापालिका शाळेची इमारत, पहिला मजला, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर रोड पोलिस ठाण्यासमोर, ग्रँटरोड, मुंबई ४०० ००७
☎ २३८९ २४ ४५ ● फॅक्स : २३८७ ५४ ८१
ग्रंथाली, इंडियन एज्युकेशन सोसायटीची म. फुले कन्याशाळा, बाबरेकर मार्ग, दादर(प), मुंबई ४०० ०२८ ☎ २४४७ ४८ ४३
Email - granthali01@gmail.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

स.न.वि.वि.

मराठीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक कायमस्वरूपी भाषा सल्लागार समिती निवृत्त न्यायाधीश नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली नेसण्याची घोषणा केली आहे. या समितीची अधिकारकक्षा काय असेल, तिचे काम प्रभावीपणे व्हावे यासाठी कोणत्या प्रकारची यंत्रणा असेल आणि तिचा दर्जा काय असेल आदी प्रश्नांना यथावकाश उत्तर मिळेलच. समितीच्या कार्याला सार्वत्रिक शुभेच्छा प्राप्त होतील हे नि:संशय. मात्र आजवरचा शासकीय खाक्या पाहता चपळगावकर यांच्यासमोरचे आव्हान खरोखर खडतर आहे. लालफित भेदून काम करणे अत्यंत कठीण असते. त्यातच समितीमध्ये सहा शासकीय सदस्य आहेत. यापैकी एक भाषा संचालक सोडले तर इतर सचिवांना मराठीचे ज्ञान असेलच हे छातीठोकपणे सांगणे चुकीचे ठरेल. सुदैवाने या समितीबाबत आज तशी परिस्थिती नाही. त्यामुळे भविष्यातही मराठीचे जाणकार सचिव या समितीवर असतील अशी आशा करता येईल. समितीचे अशासकीय सदस्यही मराठी साहित्यविश्वाला परिचित आहेत. त्यामुळे या सर्वांच्या प्रयत्नांना यश येऊन ''मंत्रालयाच्या दारात भिकाऱ्यासारखी उभी मराठी'' सन्मानाने मंत्रालयात प्रवेश करील अशी खात्री बहुतेकांस वाटू लागली आहे.

वास्तविक कोणत्याही आदर्श राज्यशासनप्रणालीमध्ये सांस्कृतिक कामकाजात सरकारचा सहभाग नगण्य असतो. त्या राष्ट्रातील भाषा आणि साहित्य स्वबळावर विकसित होत असतात. याउलट जेथे गुलामी मनोवृत्ती प्रबळ असते त्याठिकाणी आम जनता प्रत्येक निर्णयासाठी सरकारच्या तोंडाकडे बघते. सरकार चालवणाऱ्यांची खुशामत करून राजकीय दलाल आपली पोळी भाजून घेतात. नेमका हा धोका ओळखून यशवंतराव चव्हाण यांनी लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारख्या तज्ज्ञांना पूर्ण स्वायत्तता देऊन काम करायला सांगितले. त्यांना शासकीय चौकटीचा अडसर येणार नाही याची खबरदारी त्यांनी घेतली. अर्थात यावरही टीका करणारे संशयात्मे होतेच. परंतु हे लोकशाहीत चालणारच. मात्र चपळगावकर यांना प्रथमपासून सावध राहावे लागेल. अन्यथा नोकरशाही त्यांनाही जेरीस आणल्याखेरीज राहणार नाही. मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिराचे उदाहरण अगदी ताजे आहे. उत्तम कार्यक्रमांच्या आयोजनावर लक्ष केंद्रीत करायचे की मंत्रालयातील अधिकाऱ्यांच्या तावडीतून फाईल्स सोडवण्यावर, या कूटप्रश्नाचे उत्तर शोधण्यातच संबंधितांची दमछाक होऊन जाते. एखादी बनेल व्यक्ती तर एवढा छळवाद करते

की सर्वसंगपरित्यागाची भावना निर्माण होते. मंत्रालयाच्या शेजारी आकाशवाणीच्या इमारतीत एक छानसे प्रेक्षागार आहे. त्याचा वापर अलीकडच्या काळात बंद पडला आहे. कारण काय? कागदी घोड्यांचा नाच. इतर शहरांमध्येही शासकीय अनास्थेची उदाहरणे ठायी ठायी आढळतात. अर्थात या समितीच्या बाबतीतही तसेच घडेल असे म्हणणे गैर ठरेल. एकदा शासकीय अधिसूचना प्रसिद्धी झाली की अनेक बाबी आपोआपच स्पष्ट होतील.

तथापि, या समितीवर एकाही दैनिकाचा संपादक नसणे काहीसे खटकते. दैनंदिन जीवनात विविध स्तरांतील जनतेबरोबर संबंधित (काही अपवाद वगळता) असणारा संपादक भाषाविकासावर निर्णय घेताना मोलाची भर घालू शकतो. कारण सतत वापरले जाणारे शब्द त्याच्यासमोर एकामागून एक येत असतात. अनेक शब्द आणि संज्ञा यांना पर्याय शोधावे लागत असतात. काही प्रमाणात त्याला इंग्रजीचीही समज असू शकते. त्यामुळे एखाद्या मराठी दैनिकाचा संपादक समितीवर आल्यास तिचे काम आणखी प्रभावी होऊ शकेल.

समितीच्या सदस्यांपैकी बहुतेक ज्येष्ठ नागरिक असून सर्वांनीच पन्नाशी ओलांडली आहे. पुढील २५ वर्षांसाठीचे धोरण ठरवण्याची जबाबदारी समितीवर टाकण्यात आली आहे. सर्वप्रथम असे धोरण तयार करण्याचे कर्तव्य समितीला पार पाडावे लागेल. त्यानंतर ते जनतेसमोर जाईल आणि अखेर त्यावर सरकारी शिक्कामोर्तब होईल. पुढे त्या धोरणाची अंमलबजावणी कशी होते, तिचा वेग आणि प्रभाव वाढवण्यासाठी काय करावे लागेल आदी मुद्यांचा पाठपुरावा करण्यासाठी समितीमध्ये काही तरुणांचाही समावेश करणे सयुक्तिक ठरले असते. समितीच्या सदस्यांच्या वयोमानावरूनही मराठीबाबतची आस्था आणि कळकळ स्पष्ट होते. त्यामुळे आणखी काही अशासकीय सदस्यांना समितीमध्ये घेण्यावर बंदन असण्याचे कारण नाही.

समितीला सर्वप्रथम प्राथमिक स्तरावरील मराठी पाठ्यपुस्तकांचा प्रश्न हाती घ्यावा लागेल. देशाच्या भावी नागरिकांचा पिंड ज्या योग्यतेच्या भाषेवर पोसला जाईल तशीच भाषा ते पुढे आत्मसात करतील. सुमारे अर्धशतकापूर्वीपर्यंत मराठी शिकताना विद्यार्थ्यांना आनंद होत असे. त्यामुळे त्या काळात पाठ केलेल्या कविता आजही अनेकांना तोंडपाठ आहेत. मात्र शासकीय पाठ्यपुस्तके आली आणि त्यांच्यातला रस संपला. हल्ली तर साहित्यबाह्य निकष वापरून धडे आणि कविता यांची निवड होत असते अशी चर्चा आहे. अस्सल साहित्य हाती पडताच ओळखू येते. त्यामुळे साहित्यकार शहरी की ग्रामीण, मध्यमवर्गीय की दारिद्र्य रेषेखालचा, दलित की उच्चवर्णाचा असले निरर्थक पण घातक वाद पेटवण्यात येतात तेव्हा मनाला वेदना होतात. या धोकादायक प्रकृतीवर कोणती उपाययोजना करायची हे समिती ठरवणारच आहे. परंतु असल्या हाणामारीत बालकांचे नुकसान होऊ नये ही भावना नक्कीच आहे. असो.

सांस्कृतिक धोरणापाठोपाठ भाषे-बद्दलही निर्णय झाला आहे. मुख्यमंत्री २५ कोटी आणि ५० कोटी अशी चौफेर आकडेफेक करत आहेत. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच. कोणाच्याही हस्ते, पण मराठीचे घोडे शासकीय गंगेत न्हायला जाणार आहे हेही नसे थोडके!

नको त्या क्षेत्रात सरकारी ढवळाढवळ झाल्यास समाजाचे नुकसान होते. तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी आठवीपासून इंग्रजी समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आणि एक अख्खी पिढी गारद झाली. महाराष्ट्रात विनाअनुदान तत्त्वावर खासगी तंत्रनिकेतने आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांचे पेव फुटले. यामुळे कोणाचे भले झाले हे स्वयंस्पष्ट आहे. मराठी भाषेची अशी परवड होणे अतार्किक म्हणता येणार नाही. त्यामुळे भाषेच्या बाबतीत भावना आणि विचारसरणी दूर ठेवून, शुद्ध भाषाशास्त्रीय निकषांवर निर्णय होणे इष्ट ठरेल. 'मरावे परी कीर्तिरुपे उरावे' अशी म्हण आहे. शासन आणि समाज यांचा प्राधान्यक्रम नेहमीच एकसारखा असेल हा आग्रह धरणे लोकशाहीसाठी मारक ठरेल. शासनाने नेमलेली भाषा सल्लागार समिति उघडच लोकानुनयासाठी नेमली आहे. तथापि याकडे दुर्लक्ष करून समितीने काम केल्यास ते गुणवत्तेच्या मापकावर सरस ठरेल.

आजच मराठीचा बोली वापर कमी होत असल्याचे मुंबईत स्वच्छ दिसते आहे, पुण्यात जाणवू लागले आहे. कोकणातही सर्रास हिंदी कानावर पडू लागली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात पूर्वीपासून अनुक्रमे हिंदी आणि उर्दूचा वापर होता. त्यामुळे त्या विभागातील समाजभावना मराठीच्या आग्रहाबाबत कमी प्रखर आहेत. हे सारे घटक विचारात घेऊन समितीचे कामकाज चालण्याची अपेक्षा आहे. प्रमाण भाषा शिकणे प्रत्येक होतकरू व्यक्तीसाठी आवश्यक असते. इंग्रजी, चिनी, स्पॅनिश आदी जागतिक स्तरावरील भाषांचे व्याकरण पाळावेच लागते. त्याची मोडतोड करणारे स्वतःच बाजूला फेकले जातात. मराठीतही प्रमाणभाषेची अनिवार्यता निर्माण होणे आवश्यक आहे. एकदा ते झाले की प्रत्येक लेखक आपापल्या मगदुराप्रमाणे बोली भाषेचा वापर करू शकेल. याबाबतीतही समितीला स्पष्ट भूमिका स्वीकारावी लागेल.

**– संपादक**

# फूटबॉलच्या मैदानावरचा मराठमोळा झंझावात!

## अरुण जोशी

ब्रिटिशांसोबत फूटबॉल, क्रिकेट हे खेळ भारतात आले. त्यातल्या क्रिकेटचे प्रताप आपण जाणतो. सध्या सर्वाधिक लोकप्रिय क्रिकेटने अतिरेकी थैमान घातले आहे. पैशांचा महापूर शिरलेल्या या खेळाने आनंदापेक्षा व्यसनच लावलेले दिसते. त्यापुढे अन्य खेळ निस्तेज झाले आहेत.

एकेकाळी हॉकीला मिळणारा प्रेक्षकही लुप्त झाला आहे, तिथे फूटबॉलची काय कथा? हॉकी-फूटबॉल हे गतिमान खेळ. कौशल्य पणाला लावणारे. काही काळ हॉकीवर भारताने आपली पकड राखली, पण मैदानातून टर्फवर खेळताना आपली दमछाक झाली. राजकारण तर आपल्या पाचवीलाच पुजले आहे. त्यानेही हा परिणाम साधला.

या पार्श्वभूमीवर, १९४०-५१ या बारा वर्षांत एक मराठमोळा फूटबॉलपटू आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली मोहोर उमटवून गेला हे आपल्या खिजगणतीतही नसते. अमरावतीच्या खारतळेगाव या गावात भीमराव देशमुख नावाचा झंझावात फूटबॉलचे मैदान गाजवत होता. अकोला, अमरावती परिसरातील प्रेक्षकांच्या गळ्यातला तो ताईत होता. पाच-दहा किलोमीटर धावत जाऊन त्याचा खेळ पाहायला लोक जमत होते.

खारतळेगावातील शालेय जीवनातच त्यांच्या फूटबॉलचा आरंभ झाला. अमरावती परिसरात या शाळेचा चमू अव्वल होता. आसपासच्या परिसरांतील स्पर्धा गाजवत होता. भीमरावाची विद्युतवेगी हालचाल, बॉलवरचे नियंत्रण, अचूक पास केवळ अद्‌भुत होते. त्र्यंबक कुचे, माधवराव गुडधे, कृष्णराव गुडधे यांच्याशी जमलेला ताळमेळ प्रेक्षकांना मैदानावरची लयकारी दाखवत होता. विविध स्पर्धा जिंकणाऱ्या या चमूची गाठ गोंदियाच्या मैदानावर पडते ती मुंबईच्या यंगमेन्स ख्रिश्चन असोसिएशनच्या बलाढ्य चमूशी. खारतळेगावचा चमू हा सामना थोडक्यात गमावतो, पण त्यातील भीमराव व साथीदारांची चमक त्यांना राष्ट्रीय पातळीवर पोचवते.

पुढे, अकोल्याच्या सावताराम मिलमध्ये नोकरी करत भीमराव तिथे टीम तयार करतात. १९३९ साली पुन्हा मुंबईच्या यंगमेन्स ख्रिश्चन असोसिएशनविरुद्ध एक सामना रंगतो. ब्रिटिश राजवटीतील या सामन्यात इंग्लंडचा प्रसिद्ध फूटबॉलपटू अलेक्झांडर खेळतो. या नावाजलेल्या चमूवर भीमरावांचा चमू विजय मिळवतो. सामना हरलेला अलेक्झांडर भीमरावांच्या खेळाने इतका स्तिमित होतो, की तो भीमराव, त्र्यंबक कुचे, माधवराव गुडधे आणि कृष्णराव गुडधे या चौघांना प्रशिक्षणासाठी आणि खेळण्यासाठी मुंबईला नेतो. इथे भीमरावांच्या चापल्याला आंतरराष्ट्रीय भूमी लाभते. काही काळाने सोबतचे दोन खेळाडू गावी परततात, तर त्र्यंबक कुचे नोकरी पत्करतात.

भीमराव हा एकटा गावरान मराठी गडी मुंबईच्या क्लबमधून खेळत राहतो, वातावरणाशी जुळवून घेतो आणि अखिल भारतीय पातळीवर आपल्या पराक्रमाने डोळे दिपवणारी कामगिरी करतो. मुंबईत त्यांना रामचंद्र परब हा जोडीदार भेटतो आणि ही जोडी मैदानावर धुमाकूळ घालते. १९४१ ते १९४७ दरम्यानचे टाइम्स ऑफ इंडियाचे अंक पाहिले तर त्यांच्या खेळाची तारीफ वाचून अभिमान वाटावा. बारा वर्षांत चारशे सामन्यांत अडीचशे गोल मारणाऱ्या भीमरावांनी, आपल्या अचूक पासवर चेंडू सेंटर करत जवळपास तितकेच गोल मारण्याची संधी सहकाऱ्यांनाही दिली, हे लक्षात घेता त्यांची खेळावरची निष्ठा किती सखोल होती हेही दिसते.

लंडन इथे भरलेल्या १९४८ च्या ऑलिंपिकसाठी त्यांची निवड झाली होती, पण जाण्याआधी झालेल्या एक प्रदर्शनी सामन्यात गुडघ्याला गंभीर जखम झाल्याने त्यांची ती संधी हुकली. पुढे, १९४९ साली उत्तर-पूर्व आशियातील मलेशिया, इंडोनेशिया, कंबोडिया, फिलिपाइन्स, हाँगकाँग, म्यानमार व थायलंड या सात देशांतील, वीस आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी पाठवलेल्या चमूत भीमराव होते. यात वीसपैकी एकोणीस सामने जिंकून व एक बरोबरीत ठेवून संघ परतला. ऑलिंपिकमध्ये खेळायची संधी हुकलेल्या भीमरावांनी भुकेल्या वाघासारखे हल्ले चढवले. फूटबॉलच्या आंतरराष्ट्रीय इतिहासावर भीमराव देशमुख या नावाने आपली मुद्रा उमटवली.

भीमराव १९५१ साली खेळातून निवृत्त झाले. या मनस्वी माणसाने त्यानंतर विवाह करून सामान्य जीवन जवळ केले. प्रसिद्धीत असताना वा नंतरही आपला बडेजाव कधी मांडला नाही. धाडसी, शीघ्रकोपी, सतत घाई असलेल्या या व्यक्तिमत्त्वाने विनाकारण कुणाला दुखावले तर नाहीच, पण खेळातून मिळालेल्या साऱ्या वैभवास दिलदारपणे उधळले. त्यांच्या खेळाइतकेच त्यांचे जीवन विस्मयकारक होते. 'ग्रंथाली'तर्फे त्यांचे चरित्र १० जुलै रोजी प्रसिद्ध होत आहे.

**– प्रतिनिधी, ग्रंथाली**

# माहितीचा बदलता भूप्रदेश, अवधानाचे अर्थशास्त्र आणि माध्यमांपुढील नवी आव्हाने

**प्रशांत दीक्षित**

वाचकांना जी भरभरून माहिती दिली जाते ती त्यांना खरोखर हवी आहे का, की माहितीच्या भडिमारामुळे वाचकाला मानसिक थकवा येऊ लागल्याने वृत्तपत्रांचा खप कमी होऊ लागला आहे, असे प्रश्न आता माध्यम-क्षेत्रापुढे उभे राहिले आहेत.

माध्यम चालविण्यासाठी लागणारे वाढते आर्थिक बळ ही समस्या कायम असली तरी माहितीचे बदलते स्वरूप आणि वाचकांचे कमी होत चाललेले अवधान या अधिक मूलभूत समस्या माध्यमक्षेत्राला भेडसावत आहेत.

तंत्रज्ञानाने गेल्या दशकात माहितीचा भूप्रदेश (इन्फॉर्मेशन लॅन्डस्केप) बदलून टाकला आहे. हा भूप्रदेश समजून घेऊन माध्यमांना काम करावे लागणार आहे. दोन दशकांपूर्वीपर्यंत वृत्तपत्रांची संख्या मर्यादित होती. जगाची ओळख त्या वृत्तपत्रातून करावी लागत असे. परदेशी वृत्तपत्रे मिळणे दुरापास्त होते. पुस्तके विकत घेणे परवडत नसे. वृत्तपत्रे कमी असल्यामुळे सर्वांच्या मतांना वा प्रतिक्रियांना प्रसिद्धी मिळणे जवळपास अशक्य होते. अनेकदा कोणाला डोक्यावर चढवायचे व कोणाला पाडायचे हे वृत्तपत्रे ठरवत असत. वाचकांना काही ठरावीक वृत्तपत्रांतून माहिती मिळवावी लागत होती. माहिती मिळविण्याचे दुसरे मार्गच उपलब्ध नव्हते.

गेल्या दहा वर्षांत या परिस्थितीत पूर्ण बदल झाला आहे. आज मला माझे मत मांडण्यासाठी वृत्तपत्रांची गरज नाही. माहिती देण्यासाठी प्रसिद्ध व्यासपीठाची आवश्यकता नाही. माझ्याकडील माहिती वा माझे मत मी अत्यंत कमी खर्चात व अगदी कमी वेळेत जगासमोर मांडू शकतो. इंटरनेटच्या माध्यमाने ते सहजही झाले आहे.

आज इंटरनेटवर सुमारे ९ कोटी ब्लॉग्ज आहेत व रोज त्यामध्ये भर पडत आहे. सुमारे १७ कोटी संकेतस्थळे आहेत. दोन वर्षांपूर्वीच्या आकडेवारी-नुसार रोज २१० अब्ज ई-मेल पाठवले जातात. म्हणजे इतकी प्रचंड माहिती रोज वाचकांना उपलब्ध होत आहे.

माहिती मोजण्याचे गिगाबाइट हे एकक होते. ते लहान पडू लागल्यामुळे एक्झाबाइट हे एकक वापरात आले आहे. अमेरिकेतील लायब्ररी ऑफ कॉंग्रेस हे जगातील सर्वांत मोठे ग्रंथालय आहे. तेथील पुस्तकांची संख्या कित्येक लाखांत आहे. अशा ३७००० लायब्ऱ्या सामावतात पाच एक्झाबाइटमध्ये! या एककाची व्यापकता यावरून लक्षात येईल. २००६ मध्ये एकूण १६१ एक्झाबाइट डेटा जगात निर्माण झाला. मानवी इतिहासात आजपर्यंत लिहिल्या गेलेल्या सर्व पुस्तकांमधील मजकुरापेक्षा २००६ या एका वर्षात ३० लाख पट अधिक मजकूर लिहिला गेला आहे!

याशिवाय, व्यक्तीच्या आवडी-निवडीनुसार वेचक माहिती देणे, काही क्षेत्रांची विशेष माहिती देणे असेही पर्याय वाचकांसमोर आले आहेत. वेगाने वाढणारे टीव्ही चॅनेल तसेच मनोरंजनाचे अनेक पर्याय तंत्रज्ञानामुळे उपलब्ध झाले आहेत. थोड्या काळात जास्तीत जास्त माहिती वाचकांना देण्याची स्पर्धा सर्व माध्यमांमध्ये चाललेली दिसते.

एका बाजूला असा वेगाने विस्तारणारा आणि त्याचवेळी सतत बदलणारा माहितीचा भूप्रदेश आहे. तर दुसऱ्या बाजूला ही माहिती समजून घेण्यासाठी आवश्यक असणारे वाचकांचे अवधान आहे. अवधान ही मानवाची विशेष क्षमता आहे. माहितीच्या महापुराने माणसाकडील या सर्वाधिक महत्त्वाच्या क्षमतेचा बळी घेण्यास सुरुवात केली आहे. वृत्तपत्र या प्रॉडक्टचा आस्वाद घेण्यासाठी वाचक डोक्याचा उपयोग करतो. या प्रॉडक्टशी जोडणारे तेच त्याचे साधन आहे. माणूस किती वेळ अवधान देऊ शकतो व त्याची व्याप्ती किती असू शकते यावर बरेच संशोधन झाले आहे. एकाच वेळी आपण अनेक गोष्टी करू लागलो की आपली कार्यक्षमता कमी होते व चुका करण्याचे प्रमाण बरेच वाढते. मल्टीटास्किंगचे आपण अलीकडे बरेच कौतुक करतो. परंतु मल्टीटास्किंग किंवा एकाच वेळी अनेक कृती करताना अवधानाची तीव्रता कमी होत जाते.

अवधानाची तीव्रता कमी होणे हाच

कळीचा मुद्दा आहे. कारण आपले अवधान एखाद्या गोष्टीवर जितके अधिक केंद्रीत होते वा तीव्र होते तितके त्या गोष्टीपासून आपल्याला मिळणारे समाधान वाढत जाते. हा अनुभव सर्वच क्षेत्रांत येतो. दहा वृत्तपत्रे चिवडून जे समाधान मिळत नाही ते एक वृत्तपत्र अवधानपूर्वक पूर्ण वाचल्यास मिळते.

मायकेल पोसनर याने अवधान क्रियेचा बराच अभ्यास केला आहे. त्याच्या मते, अवधान क्रिया तीन पातळ्यांवर काम करते. प्रथम एखादी गोष्ट आपले लक्ष वेधून घेते व त्यातून आपली जाणिवेची स्थिती बदलते. दुसऱ्या टप्प्यात आपण तिला प्रतिसाद देतो आणि तिसऱ्या टप्प्यात तिच्यावर काही निर्णय घेतो.

माहितीच्या भडिमारामुळे वाचकांनी दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यावर जाणे बंद केले आहे. साहजिक वाचकांचे अवधान अव्यवस्थित होऊ लागले आहे. यातून culturally induced form of attention deficit disorder निर्माण झाली आहे. याबाबत बरेच संशोधन सुरू आहे. एडवर्ड हॉलोवेल याने सध्याच्या आपल्या जीवनशैलीचे चांगले वर्णन केले आहे, की माणूस या शतकात शारीरिक अतिश्रमाकडून मेंदूच्या अतिश्रमाकडे वळला आहे. पूर्वी शरीरावर बोजा पडायचा. आता मेंदूवर बोजा पडत आहे.

निर्मिती करण्यातून मेंदूला खरे समाधान मिळते. तथापि, सध्या मेंदूवर इतक्या संवेदना सतत आदळत असतात की त्यांना प्रतिसाद देता देता तो खूप थकून जातो. चिंतन, विश्लेषण व निर्मिती याकडे तो वळतच नाही. मेंदू अस्वस्थपणे सतत माहिती चिवडीत बसतो. कायम चंचल राहतो. ही चंचलता दूर करून वाचकांचे अवधान कसे मिळवायचे हे माध्यमांसमोर सर्वांत मोठे आव्हान आहे.

यातून अवधानाचे अर्थकारण (attension economy) ही संकल्पना आता चर्चेला आली आहे. साधनसामुग्रीचे वाटप, तसेच मागणी व पुरवठ्याची सांगड म्हणजे इकॉनॉमी. या नव्या माहितीच्या भूप्रदेशात साधनसामुग्री म्हणजे वाचकांचे अवधान. ते मर्यादित झाले आहे आणि माहितीचा पुरवठा कित्येक पटींनी जास्त आहे. यांचा ताळमेळ जुळत नाही. प्रचंड आरडाओरडा चाललेल्या घरासारखे प्रसारमाध्यमांचे क्षेत्र झाले आहे. ही माध्यमे वाचकांना भरपूर माहिती देत आहेत, पण माहितीच्या या लोढ्यांमुळे वाचक अधिकाधिक गोंधळात पडत आहे.

ग्राहकासमोर भरपूर पर्याय असावेत असे सांगण्यात येते. मात्र पर्याय वाढले की ग्राहक गोंधळतो असे आता लक्षात आले आहे. बॅरी श्वाट्झ याने more is less अशी संकल्पना मांडली आहे. भरपूर पर्यायांमुळे निवडीचे अफाट स्वातंत्र्य येत असले तरी याच स्वातंत्र्याची दहशत वाटते.

थोडक्यात, बातम्या, माहिती, मनोरंजन याचे लोकांना अजीर्ण होऊ लागले आहे. त्याचे ओझे वाटू लागले आहे. यामुळे वाचकांना थकवा वाटू लागला आहे. ओझ्यामुळे आलेला हा थकवा वाचकांनी जाणीवपूर्वक स्वीकारलेला आहे. याला learned help-lessness response असे म्हटले जाते. नवे जाणून घेण्याची उत्सुकता संपत चालली आहे.

यावर उपाय म्हणून माध्यमे आणखी जास्त माहिती देऊ लागली. माहितीचे उत्पादन वाढवले गेले. वाचकाला वेळ कमी आहे. म्हणून त्याला आकर्षित करण्यासाठी, पकडून ठेवण्यासाठी अधिकाधिक माहिती पुढे केली जाते. परंतु यामुळे माहितीचे मूल्य घसरत गेले. माहिती देण्याची किंमत घटली. माहिती स्वस्त झाली. पत्रकारितेचे खरे नुकसान यातून झाले.

खरे तर, माध्यमांनी माहितीचे मूल्य वाढवले पाहिजे. आपण देत असलेली माहिती अमूल्य आहे असे वाचकाला वाटले पाहिजे. तथापि, माहितीचे मूल्य वाढवण्याऐवजी फालतू माहिती बकाबक भरण्याकडे माध्यमांचा कल वाढला आहे. वृत्तपत्रांची सेवा वाढली, पण त्यातील माहितीचे मूल्य वाढले नाही.

वाचकाला खिळवून ठेवण्यासाठी आपण त्याच्यावर नवी नवी माहिती लादत आहोत. माहितीच्या लाटांवर लाटा येत आहेत. या माहितीवर आपले अजिबात नियंत्रण नाही असे आता वाचकाला वाटू लागले आहे. ही भावना त्याला हताश करते आणि मग तो स्वस्त मनोरंजनाकडे वळतो.

माहितीचे ग्रहण करणे, त्यावर चिंतन करणे, ती आत्मसात करून त्याचा बौद्धिक आनंद घेणे यासाठी आवश्यक असणारा वेळ व आंतरिक अवकाश तंत्रज्ञानातून देता येत नाही. हे काम पत्रकारांचे, संपादकांचे आहे. लिहीत असलेल्या मजुकरातून आपण वाचकाच्या आयुष्यात काही अर्थ आणत आहोत का, त्याच्या आयुष्यात काही मूल्यवर्धन करत आहोत का, याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. माहिती जमवणे व त्याचा प्रसार करणे हे माध्यमांचे काम आहेच. पण त्याचबरोबर माहितीची चाळणी करणे व त्यातून अर्थ काढून दाखवणे (to filter and to interprete) हे काम अधिक महत्त्वाचे झाले आहे. वाचकाच्या अवधानाला झेपेल, त्याला सहज स्वीकारता येईल व पचवता येईल अशाच स्वरूपात माहिती दिली गेली पाहिजे.

माध्यमांसमोरचे हे आव्हान अधिक मूलगामी आहे.

(या लेखासाठी कोलंबिया जर्नालिझम रिव्ह्यूमधील 'ओव्हरलोड' या लेखाचा आधार घेतला आहे.)

**– प्रशांत दीक्षित**
email - ppodix@gmail.com

# मराठीतील सशक्त साहित्याची परंपरा

## सुखदेव काळे

साहित्याचे प्रयोजन' (रुची, मे २०१०) या अंकात दिलीप चावरे यांच्या लेखात मांडलेला मराठी साहित्य आणि कला या विषयीचा नकारात्मक सूर मान्य करणे जड जाते. मुळात साहित्य, कला या प्रांतांमध्ये उत्तम थोडेच असते. बाकीचा तसा हा भरडच प्रकार म्हणायचा. जागतिक साहित्यालासुद्धा हे लागू आहे. काफ्का, काम्यू विरळाच. तिकडच्या वर्तमानाचा आढावा घेतला तरीसुद्धा मराठीत उत्तम कादंबऱ्या, नाटके, कविता, सिनेमा यांची निर्मिती झाली हे सिद्ध करणे सहज सोपे आहे.

लेखक :

गौरी देशपांडे, ह.मो. मराठे, भाऊ पाध्ये, रंगनाथ पठारे, भालचंद्र नेमाडे, राजन गवस, सदानंद देशमुख, मिलिंद बोकील, श्याम मनोहर असे अनेक.

कादंबऱ्या :

निष्पर्ण वृक्षावर भरदुपारी, तणकट, नामुष्कीचे स्वगत, कोसला, एनकीच्या राज्यात, बारोमास, रारंगढांग, शाळा अशा अनेक.

चरित्र वाङ्मय :

मल्लिका अमरशेख, कमल देसाई, दत्ता देशमुख, एस.एम., ग.प्र. प्रधान, मधू लिमये, अण्णासाहेब शिंदे, भाऊसाहेब थोरात इत्यादी अनेक

वैचारिक :

रावसाहेब कसबे, मे.पुं. रेगे, सदानंद मोरे, आ.ह. साळुंखे, विश्वास पाटील (पानिपतवाले नव्हे तर झुंडीचे मानसशास्त्रवाले), दुर्गाबाई भागवत, गंगाधर पानतावणे असे अनेक.

कविता :

अरुण काळे, नामदेव ढसाळ, ना.धों. महानोर, इंद्रजित भालेराव, विंदा, बापट, सुर्वे आदी अनेक.

चित्रपट :

उंबरठा, सामना, बनगरवाडी, पिंजरा, श्वास, झेंडा, नटरंग इत्यादी.

प्रश्न असा पडतो की या प्रकारचे साहित्य-सिनेमा वाचक-प्रेक्षकांसमोर नेटकेपणाने येत आहे का? उल्लेख केला तो साठोत्तरी साहित्याचा. त्यापूर्वीची मोठी परंपरा आहेच. मुळात साहित्यविषयक व्यवहार हा व्यासपीठीय होत चालला आहे. उत्सवप्रियता हा संस्कृतीचा महत्त्वाचा आविष्कार आहे, पण त्यामुळे अभिरुचीची जोपासना होतेच असे नाही. मराठी साहित्यात काही साहित्यिकच व्यासपीठावरून मिरवताना दिसतात. त्यात बोकील, श्याम मनोहर, नेमाडे या लेखकांचे माध्यमांना वावडे आहे की काय? श्याम मनोहरांसारखा ताकदीचा लेखक अकादमी अवॉर्ड मिळेपर्यंत फार कमी वाचकांना माहीत असावा, हा दोष कोणाचा? वृत्तपत्रे साहित्याच्या (त्यातल्या त्यात संमेलनाच्या) उखाळ्या-पाखाळ्या ज्या प्रमाणात चघळत बसतात, त्या प्रमाणात चांगल्या साहित्यकृतींचा परिचय का करून देत नाहीत? ज्याला चांगल्या साहित्याची आवड असते तो त्या त्या पातळीवर शोध घेऊन वाचत असतोच. अशा वाचकाला स्थळ, काळ, पैसा यांचे बंधन अडकावू शकत नाही. प्रश्न चांगल्या विकसनप्रक्रियेचा आहे. त्यामागची कारणे आजच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, कौटुंबिक तसेच पर्यावरणीय घटकांत शोधावी लागतील. दूरदर्शन, संगणक, मोबाइल, इंटरनेट या माध्यमांचा व्यक्तीची ज्ञानलालसा, मनोरंजन या गरजांच्या बदलत जाणाऱ्या प्रक्रियांचादेखील आढावा घेणे गरजेचे आहे. मध्यंतरी 'साधना' मासिकाने 'कादंबरी वाचा, जगायला शिका' या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. साहित्याकडे इतक्या गंभीरपणे पाहण्याची दृष्टीच विकसित झालेली नाही. त्यात हजारो वर्षांच्या अभावग्रस्त समाजास भौतिक साधने एकदम उपलब्ध झाल्याने समूहच्या समूह त्यांची खरेदी, भोग यांत शारीरिक, बौद्धिक, आर्थिक शक्ती खर्च करायला लागले, असे चित्र सर्रास दिसते आहे. त्याचा अपरिहार्य परिणाम व्याख्याने, पाक्षिके, मासिके बंद पडण्यात झाला. त्यातूनही मराठी कथा, कादंबरी व कविता सकस घडत राहिली.

सर्जनशील लेखक लिहीत असतात. वाचकांनी त्यातल्या चांगल्या गोष्टींचा शोध घेतला पाहिजे. माध्यमांनी, व्यासपीठांनी साहित्याची ॲबस्ट्रॅक्ट मांडणी करण्याऐवजी सुट्या सुट्या अंगाने चांगल्या कथा, कादंबरी, कविता यांची समीक्षा आणि परिचय करून देण्याचे काम करायला पाहिजे, असे वाटते. 'हिंदू' या कादंबरीवर सलग तीस वर्षे परिश्रम घेणाऱ्या आणि त्यासाठी जाणीवपूर्वक व्यासपीठीय, वृत्तपत्रीय प्रसिद्धीपासून दूर राहणाऱ्या नेमाडेंसारखा एक लेखक मराठीत आहे तोपर्यंत त्यातून काहीतरी इष्ट निपजणारच. इंग्रजीत असे काही झाले असते तर त्याविषयी रकानेच्या रकाने भरून लिहिले गेले असेत. चांगले निवडून

वाचकांपर्यंत नेले पाहिजे आणि वाचकांनीदेखील चांगल्याचा जाणीवपूर्वक शोध घेतला पाहिजे. यात शासनाने हे करावे आणि ते करावे, हे सगळे अतार्किक आहे. शिक्षित करून सोडावे आणि शिकलेल्यांनी शोधावे, अन्यथा शिक्षणाचा उपयोग काय?

चावरे यांनी लेखात उल्लेख केल्याप्रमाणे घे विषय लिही कादंबरी असे होत नाही. तशा त्या नसाव्यातही. अन्यथा त्यास सरकारी अहवालांची अवकळा प्राप्त व्हायची. मानवी जगण्याची व्यामिश्रता कादंबरीत अपेक्षित असते. तरीपण प्रगती आणि विकास (कातकरी, मिलिंद बोकील), दहशतवाद (बौद्धिक), बाइंडरचे दिवस (कमलाकर सारंग), जातवाद (तणकट, नेमाडेंचे चतुष्ट्य) भ्रष्टाचार (ब्र आणि इतर), सहकारी चळवळीचे अध:पतन (ताम्रपट), शिक्षणातला अनागोंदी प्रकार (विद्यापीठ) असे ढोबळ वर्गीकरण करायचे झाले तर कितीतरी कादंबऱ्या, वैचारिक साहित्य मराठीत आहेच. ग्रामीण जगण्याचे गुंतागुंतीचे आणि सगळ्याच अंगांनी उद्ध्वस्त होत चाललेले चित्रण बारोमास, तहान या कादंबऱ्यांमधून सदानंद देशमुख यांनी केले आहे. प्रश्न पुन्हा तोच. ताकदीने वाचकांपुढे ते येत नाही.


'व्हाइट टायगर'सारखी सुमार दर्जाची कादंबरी बूकर पारितोषिकामुळे बेसुमार गाजते, पण वर उल्लेख केलेल्या दर्जेदार कादंबऱ्या अनुल्लेखाने मारल्या जातात. यात बाजारू अर्थव्यवस्थेचा भाग किती आणि साहित्यक्षेत्रातले राजकारण किती याचाही अभ्यास व्हायला हवा. दिलीप चित्रे ही मराठी, इंग्रजीतील मातब्बर असामी. मराठी सारस्वतांनी आणि समीक्षेने त्यांची किती दखल घेतली? त्यांचे साहित्य वाचकांपुढे येणार कसे? चित्र्यांसारखे अतिशय बोल्ड आणि प्रांजळ कथन किती वाचकांना माहीत आहे? सात सक्कं त्रेचाळीस, प्रतिस्पर्धी (अनुवादित) लिहिणाऱ्या किरण नगरकरांचेही तसेच आणि एन्कीच्या राज्यात लिहिणाऱ्या विलास सारंगांनाही त्याच पंक्तीत! काफ्का, काम्यू या लेखकांची त्यांनी करून दिलेली ओळख एकदा वाचली म्हणजे ते वाचक काफ्का, काम्यू वाचणारच. युरोपीय लेखकांचा पटच समोर उभा राहतो. काफ्काची अमेरिका वाचताना भा.ल. पाटलांच्या 'वस्ती वाढते आहे'ची आठवण होते. पण भा.ल. पाटील मराठी साहित्यात कोठे आहेत?

मला असे वाटते, की एकेक कादंबरी, लेखक सुटा सुटा घेऊन, त्याप्रमाणे वर्षभर त्या त्या कादंबऱ्या, लेखकांवर चर्चा, परिसंवाद आयोजित करावेत. एकदा का वाचकांची गाठ एखाद्या चांगल्या पुस्तकाशी पडली, की नंतर वाचक त्या लेखकांच्या इतर पुस्तकांच्या शोधात निघणारच. कोसला, शाळा वाचल्यावर त्याचा प्रत्यय येतो. मी कोसला वाचली आणि नेमाडेंचे सगळे साहित्य, शाळा वाचली आणि बोकिलांचे तसेच. पठारे, चित्रे, गवस, विलास सारंग, गौरी देशपांडे असे अनेक दिग्गज संग्रहात सामील झाले. ती एक मनोज्ञ आनंददायक घडणारी प्रक्रिया आहे. प्रश्न येतो, की पहिल्यांदा तरी हे लेखक वाचकांपर्यंत जायला हवेत याचा.

मी एका अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापकी करतो. लेखात उल्लेख केलेली पुस्तके मुलांच्या हातात पडल्यानंतर त्यांचा प्रतिसाद थक्क करणारा होता. ग्रंथालीचे ग्रंथमोहोळ, 'रुची'सारखी मासिके, ग्रंथ घेऊन फिरणाऱ्या गाड्या या वाचक चळवळ वाढवण्यात मोठ्या प्रमाणात यशस्वी ठरतात. ग्रंथायनची व्हॅन दापोलीत आल्याने दोन वर्षे माझ्या यादीतली सगळी पुस्तके मला एका जागी मिळाली. या प्रकारच्या छोट्या गोष्टी मोठमोठ्या संमेलनांपेक्षा सूक्ष्मपणे विस्तृत पातळीवर, वर्तुळाबाहेरच्या परिघावर प्रभावीपणे परिणाम करत राहतात.

**– सुखदेव काळे**
नंदाश्री अपार्टमेंट, दापोली
जि. रत्नागिरी – ४१५७१२
मोबाईल : ९४२३३८७९५५

आज टॉवरसंस्कृतीच्या विळख्यात जात चाललेल्या 'लालबाग'चा गेल्या आठ दशकांचा सामाजिक इतिहास साकारलेला हा ग्रंथ उल्लेखनीय दस्तऐवज ठरणार आहे.




*लालबाग*
**आदिनाथ हरवंदे**
मूल्य : ४०० रुपये
सवलतीत : २४० रुपये

# अवतीभवती

## श्रीकांत पेटकर

नागपूर-वरोरा-वणीपासून आदिलाबादपर्यंत 'नंदीग्राम एक्स्प्रेस' गाडी संपूर्णत: रिकामी होती. जनरल डब्यात थोडी गर्दी होती. रिझर्वेशनच्या डब्यात एक-दोन असे तुरळकच प्रवासी होते. आदिलाबादला मात्र अचानक गर्दी वाढली. रिझर्वेशनच्या डब्यातही तुडुंब प्रवासी खचाखच भरले. सीटच्या मधल्या भागातही लोक उभे होते. वणीपर्यंत तिकीटचेकर डब्यात दोन-तीनदा आला होता. पण आदिलाबाद-नांदेड-औरंगाबाद-मुंबई या प्रवासात एकदाही तो फिरकला नाही. सारे काही मनमानी. रिझर्वेशन असतानाही प्रवाशांची गैरसोय होत होती. बाथरूमला जायला वृद्ध, स्त्रिया यांनाच नव्हे तर सगळ्यांनाच फार त्रास होत होता. कसरत करतच जावं लागत होतं.

माझ्या पुढच्या सीटवर एक जोडपं अन् त्यांची दोन मुलं बसली होती. दोन मुली होत्या त्या. मोठी असेल नऊ-दहा वर्षांची, तर छोटी नऊ-दहा महिन्यांचं बाळ. ते बाळ फार गोड होतं. आजूबाजूच्या प्रवाशांना, उभ्या असलेल्या प्रवाशांना गोड, बोबड्या बोलांनी आकर्षित करत होतं. गोड हसत होतं. मे महिन्याच्या एवढ्या उकाड्यात, गर्दीत दाटीवाटीनं प्रवास करणाऱ्यांना दोन मुलींमुळं प्रवास तेवढाच सुसह्य होत होता.

इतक्यात त्या जोडप्यातील 'त्या'ला म्हणजे नवऱ्याला अचानक अस्वस्थ वाटू लागलं. अंगभर घाम फुटला. त्यानं त्याच्या बायकोला सांगितलं. मोठ्या मुलीनं वडिलांच्या शर्टाची बटणं काढली. रुमालानं घाम पुसला. 'ती'नं शेजाऱ्यांना सांगून 'त्या'ला सीटवर निजवलं.

शेजारच्या प्रवाशांना तिनं सांगितलं, ''यांना मूतखड्याचा त्रास आहे... मागील महिन्यातच सर्व तपासण्या केल्या. काही सापडलं नाही. पण असंच घाम फुटून अंग एकदम थंड पडतं...'' वगैरे...वगैरे.

''कुणाकडे चॉकलेट वा साखर आहे का?'' असं तिनं विचारताच डबाभर ती मागणी पसरली.

कुणी चॉकलेट, कुणी पोलोची गोळी, कुणी काहीतरी गोड असं भाराभर आमच्या सीटकडे येऊ लागलं. कुणी-काही सल्लाही देऊ लागला. सीटवर वा मोकळ्या जागेत उभी असणारी माणसं त्या सीटच्या भागात जागा मोकळी करू लागली. स्वयंस्फूर्तीनं कुणी कुणाला न सांगता स्वत:हून ''पेशंट आहे. इकडे गर्दी करू नका'' वगैरे सांगू लागली.

प्रसंगानुरूप 'माणसासारखी वागणारी माणसं, बघून मला फार छान वाटत होतं. आमच्यापैकी एक थोडं डॉक्टरी ज्ञान असलेला होता. त्यानं गोळ्या, औषध तपासून योग्य त्या द्यायला सांगितल्या. छोट्या बाळाला शेजारचे प्रवासी सांभाळत होते तर मोठी मुलगी व बायको...'त्या'ला सांभाळीत होते. घाम पुसल्यानं, तोंडात पोलोची गोळी ठेवल्यानं त्याला बरं वाटत असावं. कारण थोड्या वेळातच तो झोपी गेला.

जोडप्यातील ती फार घाबरून गेली होती. नवऱ्याला याआधीही एक-दोनदा असाच त्रास झाल्याचं सांगत होती. रात्री-बेरात्री मुलींना सांभाळून नवऱ्याला दवाखान्यात दाखल वगैरे करावं लागलं होतं. भलतं-सलतं झालं तर...?मुलींच्या भविष्यांचा विचार तिच्या डोळ्यांपुढे तरंगत तर नसावा!

आम्ही शेजारचे प्रवासी तिला धीर देत होतो. ''काळजी करू नका. घाबरायचं नाही.''

''तुम्ही त्यांना चॉकलेट द्यायला सांगितलं. हे फार बरं झालं.''

गोळ्या, लवंग, चॉकलेटचा ओघ सुरूच होता. इतरत्र मरणाची गर्दी असताना आमच्या सीटजवळ मोकळी जागा होती. इकडे पेशंट आहे. गर्दी करू नका... मोकळी जागा राहू द्या... अशा सूचना लोक एकमेकांना देत होते. श्वास घ्यायला त्रास झाल्यानेच 'त्या'ला चक्कर वा उलटी आली असावी, असा माझ्या मित्रांचा अंदाज होता.

सर्व डबाच जणू एक कुटुंब झाल्याचं वातावरण बघून मला फार बरं वाटत होतं. आजही जगात 'चांगुलपणा' असल्याचं हे

---

आपल्या अवतीभवती काही घटना घडतात. ते अनुभव मनात रूजतात. स्वरूप लहान-मोठं असतं. कधी त्यातून निखळ आनंद मिळतो, कधी निव्वळ दु:ख. आपल्या संवेदनांना मात्र त्या घटना साद घालतात. इतरांना सांगाव्या अशा असतात. समाजाचं प्रतिबिंब त्यात असतं. गंभीर असो वा विनोदी, सामाजिक वा सांस्कृतिक असा अनुभव 'अवतीभवती'साठी तुम्हीही पाठवू शकता. बाराशे शब्दांपर्यंत. आम्ही त्यातील एक निवडू व प्रसिद्ध करू. अप्रसिद्ध अनुभव परत करणं वा त्यास पोच देणं शक्य होणार नाही याची मात्र कृपया नोंद ठेवावी.

---

द्योतकच तर होतं.

डब्यात शिरताना जनावरासारखी वागणारी माणसं, एका माणसाला 'अस्वस्थ' वाटू लागताच इतकं सहकार्य करतात... माझा विश्वासच बसत नव्हता.

जोडप्यातील 'त्या' झोपलेल्या नवऱ्याकडे बघत, माणसाच्या चांगुलपणाचा विचार करत असताना औरंगाबाद स्टेशन आलं. उतरणारी माणसं फार कमी होती. चढणाऱ्यांची डब्यात शिरण्यासाठी चढाओढ मला खिडकीतून दिसून येत होती. मुंबईत लोकलचा प्रवास करणाऱ्यांना याचं काही नवल नसावं, पण इथे प्रत्येकाजवळ दोन-दोन बॅगा होत्या.

आत शिरण्याचा प्रयत्न करता करता गाडी सुरू झाली. आत येऊ न शकणारे दारावरच लोंबकाळत उभे राहिले. मध्ये-मध्ये पुढच्यांना आतच्या अंगाने धक्का देत होते.

दाराजवळच्या भागात प्रचंड कोंडी होती.

'आतली-बाहेरची' नावाचा लेख शालेय अभ्यासक्रमात वाचलेला आज आठवत होता.

बाहेर दारावर बॅगेज सांभाळत लोंबकाळणारा एक इसम जोरानं ओरडत होता. ''अरे, माझा हात सुटतोय...मी पडणार...जरा पुढं सरका... मी मरेन...''

जिवाच्या आकांतानं तो ओरडत होता. त्याच्या पुढची माणसं ढिम्म उभी. निदान तोंडानं आवाज करत त्यांच्या-पुढच्या माणसांना पुढे सरकण्यासाठी सांगावं, असं मला वाटू लागलं. मी थोडा दाराच्या दिशेनं जाण्याचा प्रयत्न केला. मधल्या भागात खच्च भरलेली माणसं...

''जरा आत सरका की...बाहेर चार-पाच माणसं आहेत... त्यांना आत येऊ द्या....'' काहींनी ऐकलं. अंग हलवलं. पण जागच्या जागेवरच. पुन्हा-पुन्हा सांगून बघितलं...पण व्यर्थच...

मी माझ्या खिडकीजवळच्या सीटवर आलो. बाहेरच्या माणसाचा आवाजाचा मागोवा घेऊ लागलो. त्याचं बडबडणं चालूच होतं. मी अस्वस्थ होत होतो. काय करावं मला समजत नव्हतं... पुढच्या स्टेशनपर्यंत त्याला लोंबकाळत राहायची शक्ती दे! अशी मनोमन प्रार्थना करू लागलो.

बाहेरचे लोंबकाळणारे ओरडत होते... आतचे सारे बहिरे झाले होते. कुणालाच त्यांचं ओरडणं ऐकू येत नव्हतं. थोड्या वेळानं मलाही त्यांचं ओरडणे ऐकू आलं नाही. मला वाटलं... जागा मिळाली असावी त्यांना आत.


पुढचे स्टेशन आले. मी चायवाल्याला हाक मारली. एक चहा घेतला. चायवाल्या-जवळ दोघं-तिघं चहा घेण्यासाठी आले. त्यातील एक जण म्हणाला, ''आता थोड्या वेळापूर्वी एक जण गाडीतून पडला. माझ्या मागेच लोंबकळत उभा होता बिचारा...''

मी सुन्न झालो.

दोन स्टेशनांच्या प्रवासात दोन विरोधी प्रसंग मला बघायला मिळाले होते. थोड्या वेळापूर्वी माणसाच्या चांगुलपणाचा अनुभव बघितला होता. तर आता माणसाच्या रानटीपणाचा... की बहिरेपणाचा की.... स्वार्थीपणाचा की...... काय नावं द्यावं, कळत नव्हतं...

अवती-भवती असं घडतंच असतं. पण 'त्या'ला वाचवता आलं असतं. हेही खरंच. गाडी सुरू झाली. चलना सिखा रही है...जिना सिखा रही है'... असं म्हणत) माझा... प्रवाशांचा प्रवास सुरू झाला... पुढचा...

**– श्रीकांत पेटकर,**
ए ९/३०२, चिनार बिल्डिंग,
लोकउद्यान, कल्याण (प)-४२१३०१




**मूल्य : २०० रुपये,**
**सवलतीत : १२० रुपये**

## ध्यास आणि प्रवास
### सुलभा वर्दे

सुलभा वर्दे १९६२ साली मुंबईच्या सायन हॉस्पिटलमध्ये मेडिकल सोशल वर्कर म्हणून रुजू झाल्या. विविध प्रकारच्या रुग्णांची काळजी वाहताना तिथल्या अतिविकलांग रुग्णांची दारुण अवस्था त्यांच्या मनाचा ठाव घेत होती. जगण्याची आस हरवलेल्या या रुग्णांमध्ये आत्मनिर्भरतेतून आत्मविश्वासाची ऊर्जा निर्माण करण्याचा ध्यास त्यांनी घेतला. त्यातूनच सुरू झाला पॅराप्लेजिक फाउंडेशनचा प्रवास.

सायन हॉस्पिटलच्या एका बराकीत त्याचे बीज पेरले गेले आणि गेल्या चाळीस वर्षांत समाजाने दखल घ्यावी असे अपूर्व काम अनेक सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी उभे राहिले.

पॅराप्लेजिकांच्या शारीरिक इलाजानंतर त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक आधार, अर्थार्जनाची सोय, तना-मनाची निगा राखण्यासाठी समुपदेशन आणि क्रीडा, सहकार, सहलींमधून जीवनानंद निर्माण करून एका दुर्लक्षित घटकाचा आपुलकीने सर्वांगीण विकास साधण्यासाठी केलेल्या अथक प्रयत्नांची ही कहाणी...

# विंदांच्या काव्यातील स्त्रीरूप

## अमित पंडित

विंदांच्या काव्यलेखनातील स्त्री-रूपाचा अभ्यास करणं हा अभ्यासक आणि विश्लेषकांसाठी आव्हानाचा भाग असतो. विंदांनी काव्यातून स्त्री व्यक्त करताना तिच्याकडे चाकोरीबद्ध नजरेतून पाहिलेलं नाही, हे प्रकर्षानं जाणवतं. विंदांची कविता स्त्रीच्या व्यक्तित्वाचा शोध घेत जाते. असं करताना स्त्रीचं भाबडं उदात्तीकरण करण्याकडे विंदांच्या काव्याचा कल नसतो. परंपरेनं चालत आलेली स्त्री विंदांना मान्य नाही. उलट, परंपरेपासून, रुढीपासून बाहेर येत स्त्री ही एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून व्यक्त करण्याकडे विंदांचा कल दिसून येतो. असं असल्यामुळे समीक्षक आणि रुढीवादींना विंदांची स्त्री ही काहीशी बंडखोर, चाकोरी मोडणारी वाटत आली आहे. त्यामुळेच मधूनमधून त्यांच्या टीकेचं लक्ष्यही विंदांना व्हावं लागलं होतं.

सर्वसामान्य वाचकालाही कधीकधी, विंदांची स्त्री ही बंडखोर आहे की काय असं वाटतं. 'ईव्ह' ही अशा स्त्रीचं उत्तम उदाहरण म्हणता येईल. ज्ञानाचं फळ खायचं नाही, अशी परमेश्वराची आज्ञा घेऊन ईव्ह खरं तर पृथ्वीवर आली. स्वत:च्या आंतरिक प्रेरणेनं काहीही करण्याची तिला परवानगी नव्हती. ती परमेश्वराची प्रेषित. परमेश्वरानं स्वत:चं कार्य पूर्ण करून घेण्यासाठी तिला पृथ्वीवर पाठवली. म्हणूनच ईव्हला स्वत:चं स्वतंत्र अस्तित्व नाही. पण विंदांची 'ईव्ह' मात्र त्या ईव्हपेक्षा खूपच वेगळी वाटते. विंदा म्हणतात,

*स्वर्गसुखाला तू नच भुललीस*
*तू नच नमिले सुल्तानी बळ*
*अनंत मरणे घेऊनि माथी*
*ज्ञानतरुचे चाखियले फळ*
*या तुझिया एका पापाने*
*मानवता झाली तेजोमय*

ज्ञानाचं फळ चाखायचं नाही, ही परमेश्वरी आज्ञा मोडणारी विंदांची ईव्ह रुढीवादींना बंडखोर वाटते. पण ती एक आज्ञा मोडून जर मानवता तेजोमय होणार असेल तर ती ईश्वरेच्छा मोडणं विंदांची ईव्ह योग्य मानते.

'त्रिवेणी'मधली 'ती'ही आणखी एक वेगळं रूप दाखवून जाते. प्रेमात पडलेली 'ती' त्याच्याकडून नाकारली जाते. त्याचंही खरं तर तिच्यावर प्रेम असतं पण आयुष्यातल्या व्यावहारिक महत्त्वाकांक्षेपोटी तो तिला नकार देतो. ती तो नकार पचवते. पण कालांतरानं त्याची अवस्था दयनीय होते. मन उद्ध्वस्त होऊन, एकलकोंडेपणानं दुभंगल्या अवस्थेत समंधासारखं फिरणं त्याच्या नशिबी येतं, तेव्हा ती त्याचं वर्णन-

*डोळस भविष्याचे मुंडके नसलेले*
*वर्तमानकाळाचे धावणारे कबंध*

असं करते.

'संहिता' ही कविता पाहिली तर विंदांची स्त्री ही परंपरेला धक्के देत जाताना दिसते.

*अहल्येची शिला झाली... इतकी तृप्ती तिला कशाने लाभली?*
*प्रकाशाची गाठ सुटताना इंद्राच्या शरीराला फुटलेले डोळे कसे चमकले?*
*आणि धर्माला सहन करणाऱ्या पांचालीचा योग*
*पतिव्रता गांधारीच्या जाणत्या डोळ्यांना उमगलेली भीती*
*सीता-लक्ष्मणामध्ये विरलेले रामायण त्यांनाही न उमगले*

ह्या ओळी वाचताना रुढीवादींच्या भुवया वक्र करायला लावते. अहिल्येचं शिळा होणं हे एका शापातून घडल्याचं सर्वज्ञात आहे. अर्थात तिच्या हातून काहीतरी पाप घडल्या-शिवाय शाप मिळणे शक्य नाही. असं असतानाही विंदा मात्र अहिल्येची शिळा हे तिचं तृप्तीचं रूप मानतात. धर्म न्यायाचं प्रतीक मानला गेला असला तरी त्याचा न्याय हा पांचालीसाठी मात्र त्रासच ठरतो आणि म्हणून तिला धर्माला सहन करावं लागतं. अंध पतीची पत्नी म्हणून गांधारीनं जन्मभर स्वत:च्या डोळ्यांवर पट्टी बांधून घेतली. असं असतानाही तिच्या डोळ्यांत मात्र सदैव साठलेली भीती विंदांना दिसते. सीता आणि लक्ष्मण यांच्या पवित्र नात्यात त्यांनाही न उमगलेलं कोणतं रामायण विरलं हा प्रश्न सनातनींना नक्कीच धक्का देऊन जातो.

विंदांच्या स्त्रीवादी कवितेचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अशा कवितेतील कथा. स्त्रीरूप व्यक्त करण्यासाठी विंदांची कविता ही कथेच्या अंगानं जाते हे अनेकदा जाणवतं. अर्थात अशा कवितांमधून त्यांची स्त्री ही चाकोरीबाह्य विचार करताना दिसते.

आणि क्षणभर तिला वाटले, आपण घ्यावा याचाच प्राण
याला तुडवावे, बडवावे, रडवावे

असं 'गर्भादान' मध्ये विंदा म्हणतात. स्त्रीला दिवस गेले आहेत हे समजल्यावर तिला आनंद होणं हीच स्वाभाविक गोष्ट मानली जाते.

पण विंदांची स्त्री मात्र ह्याला अपवाद आहे. पुढचे नऊ महिने आणि दिवसागणिक वाढत जाणारा त्रास आपल्याला एकटीला भोगावा लागणार आहे, ह्याची तिला जाणीव आहे. त्यातच तिचा नवरा काही क्षणांचं सुख भोगून बाजूला झाला आहे, ही जाणीव तिला असह्य होते आणि तिच्या मनात त्याचा जीव घ्यावा असं वाटायला लागतं.

'बकी'मधून स्त्रीचं आणखी एक विदारक रूप उभं राहतं. मूळचं बकुळा नाव असलेली बकी ही एक वेश्या. तिचं स्वत:ची मुलगी सावित्री दुर्दैवानं त्याच व्यवसायात येते आणि पुढे कुष्ठरोग होऊन मरते. तिची सुजलेलं शरीर तिला सतत आठवत राहतं. कृष्णाप्पा हा बकीचा दलाल. तो तिच्यासाठी गिऱ्हाईक शोधण्याचं काम करत असतो. पण त्याला स्वत:लाच कुष्ठरोग होतो. त्याच्या डाव्या हाताची करंगळी वाकडी व्हायला लागते आणि त्याच्याशी सगळे जण संबंध तोडतात. त्याच्याकडून बकीला कोणी गिऱ्हाईक मिळत नाही तेव्हा ती स्वत: रस्त्यावर येऊन स्वत:साठी गिऱ्हाईक शोधते. पण त्याचवेळी कृष्णाप्पाची वाकडी होत चाललेली करंगळी मात्र तिच्या डोळ्यांसमोरून जात नाही. संबूशेटची उधारी तिला फेडायची आहे आणि त्याची जाणीव असल्यामुळे ती कृष्णाप्पाला म्हणते, ''इमान नाही हे इन्सान कसले.''

'चिंधी' ही शोषिताच्या दु:खाचं प्रतीक आहे. चिंधी ही अनादी काळापासून होती आणि अनंत काळापर्यंत राहणार आहे. म्हणूनच विंदा म्हणतात की, चिंधी कृष्णाआधी होती आणि कृष्णानंतरही आहे. पण ही चिंधी दु:खानं पिचून जाणारी नाही तर क्रांतीची प्रेरणा देणारी आहे. म्हणून विंदा म्हणतात,''चिंधीशी जपून बोला. चिंधी ही शोषणाचा इतिहास लिहीत असते. शोषण हे कोणत्याही ठिकाणी होतच असतं. त्याला आधुनिक जगाच्या सीमा नसतात. म्हणूनच विंदा लिहितात,

*हिमालयावर चिंधी आहे*
*मिसिसिपीवरही चिंधी आहे*
*आज उद्याची स्वप्नशिदोरी*
*या चिंधीची मिंधी आहे*
*या चिंधीची जीभ न खळते*
*पुन्हा पुन्हा मातीने मळते*

पाश्चात्य आणि पौर्वात्य अशा दोन्ही जगात चिंधीचं शोषण चालू आहे, पण तरीही आजची आणि उद्याचीही स्वप्नशिदोरी मात्र चिंधीचीच मिंधी आहे.

''थोडी सुखी थोडी कष्टी.....'' कवितेतली ती आणखी एक रूप दाखवून जाते. काहीसं मुकं करणारी, अंतर्मुख करणारी तिची वेदना बरंच काही सांगून जाते. माहेरच्या ओढीनं फार दिवसांनी घरी आलेली ती, स्टेशनात तिला एक टांगेवाला दिसतो. ओळखीचा वाटून ती त्या टांग्यात बसते. तोही ओळखीचा हसतो. माहेरच्या वाटेवर तिला तिची शाळा दिसते. शाळा पाहताना तिला त्या टांगेवाल्याची ओळख पटते. तिच्या शाळेतला तो चंदू तिला आठवतो. तेवढ्यात घर येतं, ती टांग्यातून खाली उतरते तेव्हा तिला जाणवतं, त्यानं शेवटपर्यंत तिच्याकडे दृष्टी टाकलेली नाही. जुना स्नेहबंध मनात साठवत आता त्याला परकी झालेली ती आपल्या माहेरी पोचते, ती थोडी सुखी, थोडी कष्टी अशा द्विधा अवस्थेत. जुनं काही परत मिळाल्याचा आनंद तर तिला असतोच, पण तेव्हाच, बरंच काही तिथेच माहेरच्या वाटेवर हरवल्याचं दु:खही तिच्या मनात साठून राहतं. ''थोडी सुखी थोडी कष्टी....'' कवितेतली ती मनात विचार करत असताना आपल्याशी न बोलताही बरंच काही सांगून जाते.

**–अमित पंडित**
अ–२/१०, लक्ष्मी निवास,
ज.कृ.सावंत मार्ग,
माटुंगा रोड (प.),
मुंबई – ४०० ०१६.

**महिनाभरात दुसरी आवृत्ती प्रसिद्ध!**



## *पंखाविना भरारी!*

**शरयू घाडी**

प्रसाद हा अतिविकलांग मुलगा. कोपरापुढे हातांची होणारी मंद हालचाल आणि कुशाग्र बुद्धिमत्तेची देणगी एवढीच त्याच्या शारीरिक जमेची बाजू. असा हा प्रसाद आपल्या इच्छाशक्तीने, कर्तृत्वाने केवळ एकवीस वर्षांच्या उण्यापुऱ्या आयुष्यात एक दंतकथा बनला. शिक्षण, गायन, वक्तृत्व, चित्रकला यातील त्याने केलेली कामगिरी आपल्यातील अपूर्णत्वाची जाणीव करून देते. प्रसाद म्हणजे निसर्गाचा अनाकलनीय आविष्कार. त्याच्या जीवनाची आणि त्याच्या आई–वडिलांच्या समर्पणाची ही कहाणी आहे.

**मूल्य : २०० रुपये**
**सवलतीत : १२० रुपये**

# मुंबई... महानगरांची प्रतिनिधी

**प्रकाश पेठे**

मुंबईत लोक येतच असतात. कोणी निव्वळ दोन वेळच्या खायची सोय व्हावी म्हणून येतात, तर काही स्वतःच्या हुषारीचं चीज होण्यासाठी येतात. पायाचा ठेका धरायला लावणारे आणि दिलखेचक गाणी बसवणारे ओ. पी. नय्यर पतियाळाहून मुंबईत आले. लखनौहून नौशाद आले, गुजरातेतला जयकिशन मुंबईला आला आणि आपल्या सुरावटींनी लोकांना डोलावले. पुण्यात जन्मलेल्या सी. रामचंद्रांनी मुंबईत येऊन सिनेसंगीतावर काही वर्षं राज्य केलं.

कोकणातून जयवंत दळवी, श्रीना, विंदा आले. ते परत कोकणात गेले नाहीत. असंख्य पारशी संजान–नवसारीहून मुंबईला आले. रिलायन्सचे धीरूभाई अंबानीही आपल्या गावी गेले नाहीत. कोकणातून मुंबईला येऊन धनदौलत आणि प्रतिष्ठा मिळवलेल्यांची संख्या मोठी आहे. जो आला तो आला, परत गेला नाही! शास्त्रीय संगीतकार असोत की नाटकवेडे असोत त्यांना पुण्यामुंबईनंच नाव मिळवून दिलं. हिरे व्यापारात पैसे कमावलेल्या पालनपूरच्या जैनांनी मुंबईत सातशे कोटी रुपये खर्चून लीलावती हॉस्पिटल उभं केलं. त्यामुळे मुंबईचं महत्त्व रचनेपेक्षा तिथे जमलेल्या श्रीमंत, बुद्धिजीवी आणि श्रमजीवी लोकांनी उभ्या केलेल्या माहोलमध्ये आहे. मुंबईत अनेक विद्वान शिक्षक, पत्रकार, व्यापारी सटोडिये, त्रिभुवनदास भीमजीसारखे सुवर्णकार नाव कमावून आहेत. त्यांचं प्रेम मुंबईवर असू शकेल. निवृत्तीनंतर त्यांना आपापल्या रम्य गावी परत जायची इच्छा होते का? नाही होत. तिथल्या पालिकांची स्थिती आणखीच बेशिस्तीची असते हे त्यांना पक्कं माहीत असतं. कारण मुंबई अनेक वर्षांच्या अनुभवातून घडत आली आहे.

जयवंत दळवी नुसते दादरहून बोरीवलीला गेले आणि मुंबईला मुकले. त्यांची मुंबई दादर–गिरगावात होती. एक एसटीडी–पीसीओ चालवणारे भेटले. त्यांना विचारलं 'तुम्ही कुठले?' तर म्हणाले 'मी मुंबईचा.' 'मग इथे कशाला आलात?' तर म्हणाले, ''मी आयुष्यात एकच चूक केली ती म्हणजे मुंबई सोडून या भुक्कड गावात आलो.' गेल्या वर्षी मुंबईला गेलेली दोन मुलं परत आली. त्यांना विचारलं 'काय रे, मुंबईहून परत का आलात? तिकडे गेलेलं कोणी परत येत नाही.' तर ती पोरं म्हणाली, 'अंकल, पैसे बरे मिळत होते पण राहण्याच्या जागेचे वांधे होते. आम्ही झोपडपट्टीत कसे राहणार? मग काय, आलो परत.'

रोज कितीतरी माणसं प्रथमच मुंबईत पाऊल टाकत असतील. ते नशीब अजमावायला चक्रव्युहात शिरतात. त्यातून बाहेर पडायचा मार्ग नसतो. सिनेमात काम शोधणाऱ्यांना स्ट्रगलरर्स म्हणतात. खरं तर सगळेच तसे असतात. प्रियंका, कॅटरिना, ब्राझीलची मॉडेल गिस्ले मॉन्टेरिओ मुंबईत आल्या आणि तरुणांच्या तोंडातलं च्युईंगम झाल्या. हे फक्त मुंबईत घडू शकतं. कमाल अमरोही, सुभाष घई, नितीन देसाईंनी चित्रसंस्था निर्माण केल्या. स्टुडिओत खेटा घालणारे कधीच कमी नव्हते. ते कोण मोजायला बसलंय! मोठं होऊ इच्छिणारे खूप असतात. बनणारे कमी. पण इच्छा प्रबळ असते.

कितीतरी प्रकाशक मुंबईनं मोठे केले. सर्व कलावंतांनी स्वतःच्या यशाचं श्रेय मुक्तपणे मुंबईला दिलं. एल्फिन्स्टन, फीअर, स्टिव्हन्स, जॉर्ज विटीट, शंकरशेट, गोकुळदास तेजपाल, डेव्हिड ससून यांनी मुंबईला खूप दिलं. वृत्तपत्रांचे कारखाने निघाले, दिवाळी अंक–पुस्तकं–मासिकांनी इतिहास रचला, कोणी युनियन, सेना काढल्या. सगळे सतत मागत मागत राहिले. पण मागणारी माणसं सहसा कोणाला आवडत नाहीत, देणारी आवडतात. जनता अपेक्षा करत राहिली. कोणाला घर हवे, कोणाला हॉटेलात, गिरणीत, फोर्टात काम हवे. रस्त्यावर खड्डे पडतात म्हणून शिव्या, नळाला पाणी येत नाही म्हणून तळतळाट, गाडीत मरणाची गर्दी असते म्हणून संताप. तरी सगळे तिथेच चिकटणार, कारण मुंबई पोटापाण्याची व्यवस्था करते.

नगरासाठी आपण काय करायचं? पालिका तर झाडलोट करण्यात दंग असते, मग आपण काय करायचं! 'टॅक्स दिला ना मग आणखी काय देणार?' ही सौद्याची भाषा करणारेच जास्त. मुंबईवर प्रेम करण्यात पारशी अग्रस्थानी धरता येतील. जमशेटजी जीजीभाई, वाडिया, जहांगीर, फिरोजशहा मेहता अशी किती नावं द्यावीत तितकी कमीच होतील. पुरुषार्थ करणाऱ्यांनी मुंबईला समृद्ध केलंय. तसं माथाडी कामगार मजूर, काबाडकष्ट करणारे गिरणी कामगार यांनी मुंबई जिवंत ठेवली. गोदी कामगारांनी एक

दिवस संप केला तर देशाचा व्यापार कासावीस व्हायचा. त्यानंतर मराठी, कच्छी, काठेवाडी, पंजाबी यांचा नंबर लागेल. आज मुंबईला ओरबाडणारे जास्त झालेत आणि प्रेम करणारे दिवसेंदिवस कमी कमी होताहेत.

नाविन्याचा शोध घेणारी माणसं अगदी वेगळी असतात. फार पूर्वी परदेशातून येणाऱ्या लोकांना सुरत बंदरात जहाज नांगरावं लागायचं. दिल्लीला जहांगिराच्या दरबारात व्यापाराच्या सवलती, परवाने मागायचे झाले तर ते प्रथम सुरतेला येत. तिथून तापीच्या खोऱ्यातून व बऱ्हाणपूर-उज्जैनमार्गे दिल्लीला पोचत. काही काळानं जेराल्ड ॲन्जियरला सुरत बंदर गैरसोयीचं वाटू लागलं म्हणून त्यानं कंपनीचं ठाणं मुंबईला हलवलं. मुंबईला बंदर बांधलं. त्याला तेव्हा कल्पना नसेल की मुंबई विराटनगर होईल. नंतर मुंबईत आडते, व्यापारी, माथाडी, व्यावसायिक मध्यस्थ असे सर्वप्रकारचे काम करणारे आले. बॅलार्ड इस्टेट बांधून काढलं. मुंबई कारखानदारी आणि व्यापाराचं केंद्र झालं, शिक्षणाचं केंद्र झालं, वैद्यकीय व्यवसाय फोफावला. नंतर मुंबईनं जी झेप घ्यायला सुरुवात केली ती काल परवापर्यंत.

तेच आमचं गाव खेडवळ तर मुंबई आधुनिक! महाविद्यालयात शिकणारे सगळे रोज मुंबईला जाऊन घरी परत येत. मुंबईला फ्लशिंगचे संडास तर आमच्या गावात टोपलीचे. तिकडे नळाचं पाणी तर आम्ही विहिरीतून पाणी उपसायचो. त्यांच्याकडे विजेचे दिवे तर आमच्या घरी चिमण्या-कंदील. मुंबईत ट्राम-बग्गया तर आमच्या गावी दोन घोड्यांचे टांगे, असा फरक होता. आम्ही गावंढळ, तर मुंबईकर मॉडर्न. मात्र आमच्या गावात प्रत्येक आळीत व्यायामशाळा होती, एकेका आळीत मुरलीधर, तर कुठे सिद्धेश्वर, तर कुठे देवी-गावदेवी अशी भरपूर देवळं होती, वडापिंपळाचे पार होते, पुष्करणी होत्या, तलाव होते. यातलं मुंबईत फारच कमी होतं.

लोक लग्नाचा सूट मुंबईला शिवायला टाकायचे. गावातले काही मित्र 'बॅन्ड बॉक्स'मध्ये कपडे धुवायला टाकायचे. त्यांचे पांढरेशुभ्र कपडे गावात उठून दिसायचे. लग्नखरेदी दादर-गिरगावात होई. खरेदी झाली की मराठी हॉटेलात सहकुटुंब जाऊन खाण्याचा अपूर्व कार्यक्रम होत असे. तेव्हाही एखाद्या आजींना पाय धुवायला जावंसं वाटलं तर पंचाईतच होती. मुंबईपासून फक्त पन्नास किलोमीटर अंतरावरचं आमचं गाव खेड्यासारखं. मुंबई तशी आणि आमची गावं अशी. असे प्रश्न तेव्हाही होते आणि आजही मनात येतात. एकूण काय, सामान्य माणसांकडे लक्ष देणं मुंबईलाही जमलं नाही.

अशी ही अनेक वर्षं दुरून पाहत आलेली मुंबई. पावणेदोन कोटी वस्तीच्या मुंबईचे सगळे व्यवहार चालतात कसे हा प्रश्न मनात येतो. काही वर्षांनी ही संख्या अडीच कोटींवर जाईल, तेव्हा मुंबई कशी असेल? हल्लीच पंचावन्न टक्के लोक झोपडपट्ट्यांत राहत आहेत. तो आकडा किती वाढेल? आज गाड्यांना अचाट गर्दी असली तरी रोज ठरल्यावेळी छत्रपती शिवाजी टर्मिनसहून लोकल आणि लांबच्या गाड्या सुटतात. कोणी ना कोणी ड्रायव्हर गार्ड रजेवर जात असेल, क्वचित आजारी पडत असेल, मुलाच्या ॲडमिशनच्या धावपळीसाठी रजेवर जात असेल, तरी कलकत्ता मेल किंवा पंजाब मेल धावायला सुरुवात झाल्यापासून न चुकता रोजच्या वेळेवर फलाट सोडून मार्गी लागते. लोकल अर्धी रिकामी असो की पाचपट भरलेली असो ती धावणार. दोन लिमिटेडची बस एखादा अपवाद सोडला तर रोज वेळेवर येते. नळाला पाणी येतं, ते कोणी सांगतं मोडकसागरातून येतं. कुठे आहे तो मोडकसागर? रोज केलेला कचरा कुठे जातो? उपभोग्य गोष्टींचा उगम दिसत नाही, पण मॉलमध्ये खचाखच माल भरलेला असतो. सकाळी चहा प्यायच्या वेळी बोरीवलीत, ठाण्याला किंवा पनवेलला वृत्तपत्र दारात कसं येऊन पडतं, असे एक ना दोन, शेकडो प्रश्न एखाद्याच्या मनात आले तर नवल नाही.

रेल्वे, नगरपालिका, वीज कंपनी वगैरे अनेक संस्था आहेत. त्या मुंबईचा कारभार सांभाळतात. त्यातल्या कोणालाही आपण पाहत नाही. त्यांना पाहायची उत्सुकताही वाटत नाही. किती लोकांनी म्युनिसिपल कमिशनर पाहिला असेल? ते दूरदर्शनवरही दिसत नाहीत. इमारतकर किंवा पाणीपट्टी भरण्यापुरतं वर्षातून एकदा पालिकेच्या वॉर्ड ऑफिसमध्ये जाणं होतं. यापलीकडे पालिकेशी काही संबंध येत नाही. म्हणजे महानगराच्या बाबतीत जे काही चांगलं किंवा वाईट घडत असेल त्याला जबाबदार ते असतात. प्रत्येक महानगरातले भाजीबाजार घाण असतात. ते तसे का असतात? कलेक्टर भाजीबाजारात केव्हा जातो, त्याला बस डेपोतल्या मुतारीत शेजारी उभा असलेला कोणी पाहिलाय का! त्याच्या घरची भाजी कोण आणतं, कलेक्टर सहकुटुंब सिनेमाला जात असेल का, पावसाचे अंदाज वर्तवणाऱ्या अधिकाऱ्याला मुलांना शाळेत कोण पोचवतं, त्यांच्या मुलांना शाळेत सोडायला त्याची पत्नी जात असेल का, मध्यमवर्गातली चांगल्या बुद्धिमत्तेची माणसं अधिकारी झाल्यावर वरच्या ब्रॅकेटमध्ये का जातात. या सगळ्यांना कोणी पाहत नाही. इंग्रजांच्या काळी कलेक्टर हा जिल्ह्याचा राजा असे. तो घोड्यावरून गावोगावी फिरत असे. त्याच्या बरोबर प्रांत ऑफिसर, मामलेदार अशी मोठी फौज असे. आता ते लालबत्तीच्या गाडीतून फिरतात.

सर्व महानगरांचं व्यवस्थापन करायला आयुक्त नेमले जातात. त्यांचं काम डॉक्टरांसारखं असावं. जो रोगी येईल त्याला औषध द्यायचं. रस्त्यावर चालणारे काय सहन करतात ते त्यांच्या लक्षात येत नसावं किंवा नगरावर प्रेम करण्याचं त्यांच्या प्रकृतीत बसत नसेल. जिथे पाठवतील तिकडे फक्त व्यवस्थापन करायला जायचं, म्हणजे जे आहे ते जमेल तसं पुढे न्यायचं. नाविन्याचा शोध घेण्याच्या भानगडीत पडायचं नाही. कारण त्यात चूक होण्याचा संभव असतो आणि व्यवस्थापकाला चूक सहन होत नाही.

महानगरासाठी काम करणारी खूप माणसं असतात. ती लक्षात येत नाहीत. त्यांना नाव नसतं. ते कर्मचारी असतात. सफाई सेवक असतात. एक निवृत्त झाला की त्याच्याजागी दुसरा येतो. काही काम करतात, काही अळंटळं करतात. त्यांना तू काय काम केलंस हे फारसं विचारलं जात नाही. नेमका माणूस हाताशी येत नाही. नगराचा कारभार जसा मागच्यानं चालवला तसा पुढचा चालवतो. कोणतंही काम मंजूर करण्यास पाचपन्नास माणसांचा होकार लागतो. कोणी खोडा घालतो. निर्णय प्रक्रिया लांबते. प्रजेला सहन करावं लागतं.

मुंबई, पुणे, अहमदाबाद, दिल्ली यांसारख्या महानगरांतल्या आयुक्ताला शिंकायलासुद्धा वेळ नसतो. हाताखालच्या कर्मचाऱ्यांकडून आलेल्या दोनतीनशे फायली रोज वाचायच्या म्हणजे कर्मकठीण. त्या दिवसा वाचता येत नाहीत कारण दिवसभर मीटिंगा असतात. रात्री जागरण करून फायली वाचून मार्जिनमध्ये सूचना द्यावा लागतात. या सगळ्या फायलींत नव्या आयोजनाची एखादी फाईल आली आणि तिचा विचार होणार ते खातं झोपलं असलं तर काही घडत नाही. भिजत पडलेली लोकहिताच्या गोष्टींवर पुन्हा पाणी शिंपडून ओलं ठेवलं जातं. ऊठसूट बदल्या होणाऱ्या आयुक्तानं ते महानगर पुरेसं पाहिलेलं नसतं. महानगराची नस ओळखणं भल्याभल्यांना जमत नाही तिथे वर्षभर खुर्चीत बसून नव्या गावी पोस्टिंग होणाऱ्याला काय कळणार!

कोणीही अधिकारी सहसा स्वतःहून नवं काम उभं करत नाही, अगदी आयुक्त-सुद्धा. लोकांचे अर्ज आले वा सभासदांनी हेका धरला तर काहीतरी केलं जातं. कायद्यात अनधिकृत बांधकामं तोडावीत असं कलम आहे. त्याचा उपयोग करावा की न करावा हे ठरवण्याचा अधिकार त्याच्याच हातात असतो. एक खैरनार गाजले. ते सगळ्यांना माहीत होते. वास्तविक, खैरनारांचं काम त्यांच्या जागी बसलेल्या प्रत्येक अधिकाऱ्यानं करायला हवं. कारण तसं कायद्यानंच म्हटलं आहे. नगरपालिका कायद्यान्वये पालिकांनी पार पाडायच्या कर्तव्यात रस्ते धुवावेत, त्यावरची सगळी घाण साफ करावी व सार्वजनिक जागा स्वच्छ ठेवाव्यात असं सांगितलं आहे. पार बांधावेत, पुष्करण्या कराव्यात, तलाव बांधून प्रत्येक बसथांब्याजवळ सावलीसाठी वृक्ष लावावेत, निवृत्तांसाठी बसायला बाकं ठेवावीत, व्यायामशाळा बांधाव्यात, जागोजागी सार्वजनिक शौचालयं आणि स्नानगृहं बांधावीत असं स्पष्ट लिहिलेलं नसतं, त्यामुळे होत नाही.

ते काम करायला बिहारमध्ये रामपूर गावात १९४३ साली बिंदेश्वर पाठक जन्माला आले आणि त्यांनी शौचालय चळवळ उभी केली म्हणून सुलभ शौचालयं जागोजागी होताहेत. ती लगेच लोकांच्या नजरेत येतात. लोकांना समाधान वाटतं. ते त्याला दुवा देतात. नाट्य किंवा सिनेमागृह पत्ता सांगण्यास उपयोगी पडतं! म्हणजे 'चित्रा' सिनेमाच्या मागच्या गल्लीत मी राहतो असं लोक सांगतात. त्यात आता एक भर पडलीय. कित्येक जण स्वतःचा पत्ता अमुकअमुक सुलभ शौचालयाच्या शेजारच्या गल्लीत या असा सांगतात. कारण ती कमी आहेत आणि त्यांच्या विचित्र रंगसंगतीमुळे लक्षात येतात.

अडीच कोटी लोक रोज या ना त्या कामासाठी इकडून तिकडे जात असतात. एकाच रस्त्यानं जाणाऱ्याला त्या रस्त्यातले खाचखळगे माहीत असतात. ते बुजवले की त्याच्या लक्षात येतं. लगेच तो मनात म्हणतो, 'अरे वा! बुजवले वाटतं, पण फार वेळ वेळ लागला. त्यांनी माझ्या टायरचं टक्कल केलं.' एका मित्रानं मला सांगितलं, 'जो कोणी म्युनिसिपल कमिशनर अथवा सिटी इंजिनीयरला मी रस्त्यानं चालताना पाहिलं असं सांगेल त्याला मी शंभर रुपये बक्षीस देईन. पण अजून कोणी बक्षीकस घ्यायला आलेला नाही.'

सर्व सरकारी आणि निमसरकारी माणसं बिनचेहऱ्याची असतात. ती 'एमसी', 'पीआरओ', 'एक्सीएन', 'डीई' या नावानं ओळखली जातात. आज बोरीवली फास्टला तुझा काका ड्रायव्हर आहे हे कसं कोणाला कळणार. एक निवृत्त झाला की दुसरा येतो. ते गाडं वर्षानुवर्षं चालत राहतं. तरी एल्फिन्स्टनपासून ते आपल्या जे. बी. डिसोझा, स. गो. बर्वे, तिनईकर, पिंपुटकर, माधव गोडबोले, श्रीनिवासन, एच.एम. पटेल अशा उच्च अधिकाऱ्यांची नावं आपल्या तोंडी का असतात? वास्तविक, ती माणसं माहिती असण्याचं कारण नाही.

बाकीच्या आयुक्तांची नावं आपल्याला का माहिती होत नाहीत? तेव्हा अशी माणसं होती तर त्यांचं कार्यक्षेत्र मर्यादित का असे? तीच माणसं सचिवालयात बसल्यावर मुंबई जवळच्या उपनगरांचा विचार का करत नसावेत, का त्यांना माहिती असून ते आपल्या कार्यक्षेत्राच्या बाहेर जात नसतील.

वाढत जाणाऱ्या विशाल मुंबईला आकार देण्यासाठी मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन डेव्हलपमेंट रिजनची निर्मिती होऊन पस्तीस वर्षं झालीत. बृहन्मुंबईत सव्वा कोटी लोक राहतात तर बाहेरचा विस्तार साठ लाख. साठ लाख हा आकडा लहान नाही. ती पुण्याची किंवा अहमदाबादची वस्ती झाली. ती पन्नास लाख माणसं मुंबईशी जोडलेली आहेत. एमएमआरडीएच्या जन्माच्या कितीतरी आधीपासून कल्याण किंवा विरारची माणसं मुंबईशी जोडलेली आहेत. म्हणजे मुंबई रिजन तेव्हाच जन्माला आलेला होता. तेव्हाच ती संस्था जन्माला आली असती तर ठाण्यापलीकडची सगळी उपनगरं सुबक होऊ शकली असती. अर्थात भूतकाळाला जाब विचारता येत नाही.

देशाची फाळणी झाल्यावर वस्तीच्या देवाणघेवाणीचा परिणाम सगळ्यात जास्त मुंबईला भोगावा लागला होता. १९४१ साली अठरा लाख असलेली वस्ती १९५१ साली बारा लाखांनी वाढून अचानक तीस लाख झाली. मुंबईच्या इतिहासानं पाहिलेली सहासष्ट टक्के वस्तीवाढ ही सगळ्यात मोठी होती. मुंबईत १९९१ साली दशवार्षिक वस्ती

वाढीचा दर ३७.१ टक्के होता. तो २००१ साली ३०.२ टक्के झाला. म्हणजे मुंबईत जरी वस्तीचा आकडा वाढत असला तरी वाढीचा दर कमी होतो आहे. भारतातील उच्चशिक्षित मुलाच्या डोळ्यांसमोर चेन्नई, बंगलोर, हैदराबाद, पुणे, गुरगांव ही नावं असतात. मुंबई नसतं म्हणून बाहेरगावचे मध्यमवर्गातले तरुण मुंबईला नोकरी शोधत नाहीत. कारण मुंबईत घर मिळण्याची वानवा आहे. पण ज्यांना फक्त जगायचं आहे, त्यांना चार घास पोटात घालायला मिळण्याची खात्री इथं आहे. ज्यांना झोपडपट्टी चालणार आहे असे लोक मुंबईत येताहेत. तसेच काव्यशास्त्र-विनोदात रस नसलेले श्रीमंत येतील. कारण गिरण्यांच्या जागी अलिशान घरं होताहेत.


लवकरच मुंबई दोन-अडीच कोटींची होईल तेव्हा कर्जत-कसारा-रोहा-सफाळ्यापर्यंतची विराट मुंबई असेल. तिथल्या नगररचनेचं काय? आयटी क्षेत्रात खूप लोकांची भरती होत असते. यापुढे ज्यांना तो व्यवसाय करायचा असेल त्यांनी तो नव्या मुंबईत केला पाहिजे असा नियम करावा. आपल्या इथे सगळंच अमेरिकेच्या पावलावर पाऊल टाकून चालणं होत असेल तर तिथले नियमही पाळले पाहिजेत. तिथे विशिष्ट मर्यादेपलीकडच्या शाळेत प्रवेश घेता येत नाही. एकही विद्यार्थी लोकलमध्ये दिसता कामा नये. सर्व शाळा महाराष्ट्र बोर्डाच्या असाव्यात, मराठी हा एक विषय सक्तीचा असावा वगैरे वगैरे. आज काय आहे आणि उद्या काय होणार याची चिंता असते, पण तरीही काल काही चांगलं घडलं असतं तर आज सुखाचे दिवस असते असं तर मनात येतं. माणसं अडचणींना तोंड देत देत जगत असतात. ती तक्रारही करत नाहीत.

लोकलनं प्रवास करणाऱ्यांचे हाल अवर्णनीय आहेत. त्यांना बसून प्रवास करायला मिळावा असं स्वप्नरंजन करण्याचा मोह आवरत नाही. कल्याण ते दादर नव्या लायनी जितक्या लवकर बनतील तितक्या हव्या आहेत. दोन-चार फ्लाय ओव्हर कमी केले आणि तितक्या पैशांत प्रत्येक वॉर्डात चारचार स्वच्छतागृहं बांधली तर लोकांना आनंद होईल. स्त्रियांसाठी ती नसतातच. लोकांच्या नेमक्या गरजा ओळखून ती कामं आपणहून कोणी करत नाही हे दुःख आहे. आपापल्या मोहल्ल्यात सगळ्यांना वृत्तपत्र वाचायला मिळावीत म्हणून लोक पैसे जमा करून ती सोय करतात. महानगरासाठी छोट्या छोट्या पण महत्त्वाच्या, तरी कमी खर्चाच्या सोयी करण्यासारख्या असतात. त्यातल्या थोड्याफार झाल्या तरी लोकांना आनंद होईल आणि महानगरातलं जिणं थोडं का होईना सुखाचं होईल. तळतळाट कमी होईल. ऊठसूट रक्तदाब वाढणार नाही.

**– प्रकाश पेठे**
४, शांतिनगर, तरसाली, वडोदरा ३९०००९
prakashpethe@gmail.com


## रेषेपलीकडील लक्ष्मण

संपादन : **डॉ. यशवंत मनोहर, डॉ. रावसाहेब कसबे**



भटक्या-विमुक्तांच्या उत्थानासाठी देहभान हरपून, झोकून काम करत, या समाजात आत्मसन्मान निर्माण करण्याचं काम लक्ष्मण मानेंनी केलं. त्यासाठी लेखणी चालवली, घणाघाती विचार मांडले. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा, संशोधन केंद्रे काढली. हा 'उपरा' ४२ जमातींचा 'आपला' झाला. बाबासाहेबांच्या वाटेने जात धम्मदीक्षा घेऊन माणूसपणाच्या वाटेवर निघालेल्या या अवलियानं समाजावर आपला अमिट ठसा उमटवला.

एक सर्वसामान्य मुलगा स्वतःच्या कर्तबगारीनं लेखक, विचारवंत, कलावंत, गुणवंत, साहित्यअकादमी ते पद्मश्रीसारखे पुरस्कार घेणारा कार्यकर्ता, प्रेमळ-वत्सल पती, पिता आणि एक चांगला माणूस कसा बनतो याचं उत्तम उदाहरणं म्हणजे लक्ष्मण माने. या व्यक्तीला शब्दांत बांधणं तसं कठीणच, तरी त्यांच्या सहवासात आलेल्या विविध स्तरांतील व्यक्तींच्या अनुभवातून त्यांचा वेध घेण्याचा हा प्रयत्न.

**मूल्य २०० रुपये;**
**सवलतीत १२० रुपये**

# सानेगुरूजींचा वात्सल्यस्पर्श

**मदन धनकर**

१९६२ साली चिनी आक्रमणानंतर चंद्रपूरला शिबीर घेण्यात आले. समाज प्रबोधन संस्थेने शिबिराचे आयोजन केले होते. शिबीराचा संयोजक मी होतो. 'चीनचे आक्रमण' पुस्तक, अभ्यासविचारार्थ देण्यात आले. तीन दिवस चाललेल्या शिबिरासाठी प्रा. ग.प्र. प्रधान व वसंत पळशीकर यांचा चंद्रपुरात मुक्काम होता. शहराच्या मध्यवर्ती असलेल्या न्यू इंग्लिश हायस्कूलच्या सभागृहात शिबीर चालले. त्यापूर्वी संस्थेचे सचिव पन्नालाल सुराणा यांचे जाहीर व्याख्यान नगर परिषद सभागृहात आयोजित करण्यात माझा पुढाकार होता.

प्रधान-पळशीकर यांचा मुक्काम प्रा. बी.एल. मुठाळ यांच्याकडे होता. शिबीर दोन सत्रात चालले. सकाळी अकरा वाजेपासून एक वाजेपर्यंत व दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत अशी योजना होती. एकूण सहा सत्रात शिबीर झाले. सुमारे चाळीस युवक-युवती यांत हजर असत. पहिल्या दिवशी उद्घाटन आदी उपचार नव्हता. परिचय व थेट विषय प्रवेश. दुपारच्या सत्रात उपस्थिती जेमतेम तीस होती. प्रधानसर मला व शिबिरार्थींना म्हणाले, ''उपस्थिती किती आहे, हा मुद्दा गौण आहे. ज्यांना नियमित सहाही सत्रांना यायचे आहे. त्यांनी वेळेवर रायटिंग पॅड-पेन घेऊन आले पाहिजे. शिबीर म्हणजे जाहीर सभा किंवा मनोरंजनाचा कार्यक्रम नाही.'' प्रधानसरांनी प्रेमळ तंबी दिली. पुढे त्यांच्या या सूचनेचे तीन दिवस नीट पालन झाले.

चीन व भारत यांच्या राजकीय व सांस्कृतिक जीवनाचा पट आमच्यासमोर उभा करण्यात आला. चीनच्या आक्रमणाला धरून भारतीय राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणाचे पारदर्शक चित्र त्यांनी रेखाटले. देशासमोर उपस्थित समस्या किंवा आव्हाने यांचा अनेक बाजूंनी अभ्यास करण्याची पद्धत व दृष्टी प्रथमच लक्षात आली. राजकीय प्रबोधन ही संकल्पना यातून माझ्या प्रथमच लक्षात आली. शिबीर संपले पण त्यांची ओळख पुढे कायम राहिली.

त्यानंतर प्रधानसरांची प्रत्येक भेट म्हणजे स्नेहसिंधूतील अवगाहनच. प्रत्येक भेटीत जवळ घेण्याची त्यांची स्नेहार्द्र आपुलकी सारखीच भासली. त्यांची मिठी म्हणजे पोटाशी घेऊन स्वागत करण्याची जवळीक. मी सानेगुरूजींना पाहिले नाही. पण गुरूजींची पुस्तके भरपूर वाचली. त्यातील वात्सल्याचा स्पर्श प्रधानसरांच्या मिठीत जाणवला. सानेगुरूजींच्या शब्दातील प्रेमधर्म प्रधानसरांच्या सहवासात ओथंबलेला असे. सानेगुरूजींना अभिप्रेत असलेल्या कृतीचे तारण बाबा आमटेशी बोलताना जाणवत असे तर मायेचा वर्षाव प्रधानसरांच्या शब्दांतून.

१९७० साली चंद्रपूरला मी सरदार पटेल महाविद्यालयात अध्यापक म्हणून रूजू झालो. विधिमंडळ अधिवेशनाचे निमित्ताने प्रधानसर नागपूरला होते. त्यांना भेटलो. पुन्हा तीच वात्सल्यपूर्ण मिठी. 'विधिमंडळ अधिवेशनात माझा मुक्काम विदर्भातच असतो. दर शनिवार-रविवारी, मित्रसंस्था यांच्या भेटी व कार्यक्रम. तुझ्याकडे नक्की येतो. सांग केव्हा येऊ?' पहिल्याच शनिवारी येण्याची मी विनंती केली. नागपूरहून चंद्रपूरला वेळेवर आले. महाविद्यालयात दुपारी तासभर बोलले. महाभारतातील चिरंजीव व्यक्तिरेखा, टिळक-गांधी यांच्या जीवनातील स्फूर्तीप्रद दाखले आणि भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातील तेजस्वी पाने त्यांनी व्याख्यानातून सजीव केली. विद्यमान जीवनातील त्यांचे संदर्भ उलगडून त्यांनी दाखवले. किंबहुना आजचे जीवन समजण्यासाठी ते किती सहाय्यक व पूरक आहेत याचा ताळेबंद त्यांनी सादर केला. उजव्या हाताची अंगठ्याला मधोमध उभे ठेवून आवळलेली मूठ आणि सोपे व सरळ विवेचन आम्ही अनुभवले.

१९८१-८२ साली ते विधान परिषदेत विरोधी पक्षाचे नेते होते. आमच्या महाविद्यालयात मराठी, राज्यशास्त्र व समाजशास्त्राचे पदव्युत्तर वर्ग सुरू झाले. नेहरू विद्यालयात सकाळी वर्ग भरत. प्रधानसरांचे हस्ते राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन होते. वेळ सकळी ९ वाजता. ठीक ९ वाजता लाल दिव्याच्या गाडीतून ते आले. धावपळ झाली. प्राचार्य कक्षात ते बसले. 'कार्यक्रमाची वेळ झाली आहे. अडचण नसेल तर सुरू करू.' त्यांचा आग्रह कठोर होता. आम्ही हॉलमध्ये एकत्र

झालो. भारताचे तत्कालीन राजकारण आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर तासभर वर्ग घ्यावा तसे त्यांनी समजावून सांगितले. मांडलेल्या प्रमेयावर अतूट निष्ठा व पारदर्शक प्रतिपादन यामुळे विद्यार्थी-विद्यार्थिनी चकीत झाले. काहीतरी वेगळे ऐकल्यामुळे सुखावले.

१९९२ साली अहेरी येथे प्राचार्य म्हणून मी कार्यरत असल्याचे त्यांना कळले तेव्हा राजा मंगळवेढेकर यांनी लिहिलेले सानेगुरूजींचे चरित्र त्यांनी पाठवले. महाविद्यालय व अध्यापकांसाठी मी दहा प्रती मागवल्या.

नागपुरातील विधिमंडळ अधिवेशनात मी त्यांना अनेकदा भेटलो. महाराष्ट्रातील विद्यापीठ प्राचार्यांचे अधिवेशन १९९४ साली एसएनडीटी विद्यापीठात पुणे येथे झाले. अधिवेशन संपल्यावर मुद्दाम त्यांना भेटण्यासाठी 'साधना' कार्यालयात गेलो. मला पाहिल्यावर 'चांद्याचा मदन धनकर' म्हणून त्यांनी जवळ घेतले. कसलेल्या गवयाच्या रागातील सूर केव्हाही, कुठेही कायम असावा तसा त्यांचा स्नेह व स्वर कायम असल्याचे जाणवले. 'आपण चहा घेऊ' असे म्हणून त्यांनी स्वत: चहा करून मला दिला.

'मंगल तोरण' या माझ्या व्यक्ति-चित्रणात्मक पुस्तकास त्यांनी पुरस्कार लिहावा म्हणून पुस्तकाची मुद्रणपूर्व प्रत पाठवली. फोनवरून बोललो. हडपसरच्या सानेगुरूजी रुग्णालयात त्यांचा मुक्काम होता. त्यांच्याशी बोलताना खोलवर गेलेला त्यांचा स्वर व्यथित करून गेला. त्याही स्थितीत त्यांनी पुरस्कार लिहून पाठवला. चंद्रपुरातून पुणे येथे त्यांना सतत भेटणारे आमचे मित्र नरेंद्र मिश्र असत. भेटीत ते आस्थेने चौकशी करायचे. नरेंद्र मिश्र यांना प्राप्त प्रत्येक पत्रात शांताराम पोटदुखे व मदन धनकर यांचा उल्लेख हटकून असायचा. नरेंद्र नुकताच अकाली गेला. आता प्रधानसरही गेले. पत्रव्यवहार थांबला. धावत त्यांचे पत्र घेऊन येणारा नरेंद्र मिश्र आणि प्रधानसर काळाच्या पडद्याआड गेले.

**– मदन धनकर**
'हरिवंश', विद्यानगर,
गजानन महाराज मंदिर मार्ग, चंद्रपूर
फोन : (०७१७२) २५११७०


# सम्यक् परिवर्तन

संपादन : **डॉ. यशवंत मनोहर, डॉ. रावसाहेब कसबे**




सम्यक् परिवर्तन' हे मुख्य आशयसूत्र घेऊन, त्यानिमित्ताने आपल्या जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमधील आजवरच्या परिवर्तनाच्या मागोवा घ्यावा; सम्यक् परिवर्तनापुढील नवी आव्हाने अधोरेखित करावी आणि परिवर्तनाला गती प्राप्त होण्यासाठी आवश्यक त्या उपायांची चर्चा करावी असे आम्हाला वाटले.

सम्यक् परिवर्तन म्हणजे योग्य किंवा सर्व कल्याणाच्या दिशेने होणारे परिवर्तन! परिवर्तनविरोध हा जीवनद्रोह आहे. हे सर्व वंचितांनी लक्षात घ्यावे; आपल्यावर गुलामी लादणाऱ्या सर्व शोषक संस्कारांना लाथाडावे आणि सम्यक् परिवर्तनाच्या प्रकाशवाटेवर स्वतःला आणून उभे करावे. भारताचे संविधान आपल्या बाजूने, सम्यक् परिवर्तनाचा उद्घोष करीत उभे आहे. हे सर्व वंचितांना कळावे, त्यांनी भयमुक्त व्हावे आणि आपल्या ज्वलंत माणुसकीची प्रस्थापना करायला सुरुवात करावी अशी या ग्रंथाची मनापासून इच्छा आहे. (प्रस्तावनेमधून)

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

# 'जनसंवाद' - अनुभवगाथा

## सु.गो. तपस्वी

दोन हजार नऊच्या मे महिन्यात काही विचारवंतांनी एकत्र येऊन 'जनसंवाद' ह्या वैचारिक गटाला सुरुवात केली, त्याला वर्ष उलटलं आहे. 'जनसंवाद' गट सुरू होण्यापूर्वी मी स्वत: अनेकांना भेटलो होतो. समाजपरिवर्तनाचा एक प्रस्ताव घेऊन प्रतिक्रियेसाठी मी गावोगावी फिरून जनमानसाचा अंदाज घेत होतो. 'जनसंवाद' स्थापनेनंतरही हे चालू आहेच. हे अनुभव मला खूप काही शिकवून गेले. 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकर व अरुण जोशी ह्यांच्याबरोबरच्या गप्पांमध्ये बऱ्याचदा त्यांचा उल्लेख यायचा; ते त्यांना खूप जिवंत वाटायचे. अरुण तर नेहमी म्हणतो, ''हाच तुमचा खरा 'जनसंवाद'!''

अरुणच्याच आग्रहावरून त्या किश्श्यांना- त्या अनुभवांना- त्यांतून व्यक्त होणाऱ्या भावनांना- शिकलेल्या महत्त्वाच्या गोष्टींना ह्या लेखातून तुमच्यापर्यंत पोचवतो आहे. बहुतेक ठिकाणी उल्लेख नावानिशी केले आहेत, काही ठिकाणी मात्र नावं गुलदस्त्यातच ठेवणं इष्ट होतं.

माझ्या खऱ्या जनसंपर्काला सुरुवात झाली ती ग.प्र. प्रधानसरांमुळे व त्यांच्यापासून.

अशा जनसंपर्काचा विचारही करण्यापूर्वी, निवृत्तीनंतरच्या चार-पाच वर्षांत केलेला सामाजिक विषयाचा, जास्तकरून जाणवणाऱ्या समस्यांचा माझा अभ्यास 'काळाची गरज' ह्या लेखाला कारणीभूत ठरला. प्रतिक्रियेसाठी तो लेख मी परिचयातील तीन विचारवंतांकडे पाठवला होता; प्रधानसर हे त्यांतील एक मान्यवर. सरांनी सुचवले, की या विचारांचा प्रचार झाला पाहिजे. सुचवून मोकळं होणाऱ्यांतील सर नव्हते; ते लागलीच उठले, दोन-चार जुन्या डायऱ्या काढल्या आणि एक ताव त्यांनी माझ्यासमोर सरकवला.

एखाद्या आवडत्या विद्यार्थ्याला हक्कानं काम सांगावं तसं डायऱ्यांतून सर व्यक्ती निवडत गेले आणि मी नाव आणि पत्ते लिहीत गेलो. एरवी, एवढ्यावर निभावलं असतं. पण, प्रधानांचा पिंड पडला मास्तरांचा. दोन आठवड्यानंतर फोन आला, ''कुठवर आलं आहे काम, कोणाकोणाला भेटलात?'' पुढे, ती प्रक्रिया चालूच राहिली. असं म्हणायला हरकत नाही की 'जनसंवाद'ची सुरुवात प्रधानसरांबरोबरच्या त्या भेटीपासूनच झाली.

नाशिकला 'ज्ञानगंगा' प्रदर्शनात प्रस्तुत सामाजिक विषयावरील व्याख्यानासाठी गोखले एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. मो.स. गोसावी ह्यांनी बोलावलं होतं. इतरांबरोबरच्या भेटीही ठरल्या होत्या. 'देशदूत'चे देवकिसन सारडा हे एक बोलघेवडे व अघळपघळ व्यक्तिमत्त्व; दांडगा लोकसंग्रह जपणारं! एका सकाळी त्यांच्याकडे पोचलो. तेवढ्यात, न्यायमूर्ती चपळगावकर आले. ओळख झाली, नाश्ता झाला, थोड्या गप्पाही झाल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी-सकाळी देवकिसनजींचा फोन आला, ''काल काही मनमोकळ्या गप्पा झाल्या नाहीत. आज दुपारी भोजनाला या.'' शक्य नव्हतं, कारण बिजेन देसाईंकडे वेळ ठरली होती. तसं मी त्यांना सांगितलं. थोड्या वेळानं परत फोन आला, ''देसाईंकडे फोन करून, वेळ बदलून 'अकरा'ची केली आहे, त्यांच्याकडून परस्पर आमच्याच घरी या.'' उत्तम राजस्थानी जेवण, अनुभवी विचार आणि पुढील संपर्कासाठी नावं आणि पत्ते, ह्या शिदोरीवर माझ्या महाराष्ट्राच्या प्रवासाला सुरुवात झाली.

बिजेन देसाई हे एक पारशी गृहस्थ, वयस्क; 'सहस्रचंद्रदर्शना'च्या जवळ पोचलेले, मोठे कल्पक. त्यांच्या बंगल्याचं नाव आहे 'दे साई'. त्यांच्याकडेच माझी अरुण खोडेंशी ओळख झाली. ''मला मराठी वाचता येतं, समजतंही, पण ह्या गंभीर चर्चेत कोणतीही अडचण यायला नको. म्हणून, 'गावकरी'च्या खोडेंना बोलावलं आहे, चालेल ना?'' ह्या प्रश्नानंच माझं स्वागत झालं. नाशिकला एक आदर्श शाळा सुरू करण्याच्या ध्यासासाठी देसाईंनी मोठ्या हुद्याच्या प्रशासकीय चाकरीतून स्वत:ची सुटका करून घेतली होती. शालेय शिक्षणातील ह्या बालमानसशास्त्रज्ञाच्या, दर्दी जाणकाराच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यास मीसुद्धा उत्सुक होतो. कारण, 'काळाची गरज' ह्या लेखात सामाजिक परिवर्तन साधण्यासाठी जो पर्याय मी सुचवला होता तो होता शालेय-शिक्षणातून उद्याचा समाज घडवण्याचा; औपचारिक समाजशिक्षण हा विषय बारावीपर्यंतच्या शिक्षणात अनिवार्य करण्यासाठी शासनावर दबाव आणण्याचा.

लेख देसाईंनी वाचलाच होता व चर्चेदरम्यानच्या त्यांच्या बोलण्यावरून विषयासंदर्भातील माझ्या ज्ञानाचा आवाकाही त्यांनी जोखला असावा. निघताना देसाईंनी मला एक उपदेश केला. ''तपस्वी, तुमची वृत्ती स्कॉलरची (अभ्यासकाची) नाही. तुम्ही सायन्टिस्टच्या (संशोधकाच्या) भूमिकेतून जाणवलेल्या समस्येवर उपाय शोधण्याच्या मानसिकतेतून, तर्कबुद्धीने प्रस्ताव मांडला आहे व तो योग्यही आहे! परंतु, तुम्हाला स्कॉलर लोकांकडून खूप विरोध होईल; त्या तात्त्विक वादांमध्ये तुम्ही जिंकू शकणार नाही, तेवढा तुमचा अभ्यास नाही. तुमची वृत्ती प्रॅक्टिकल आहे,

न्यूटनसारखी. दोन मांजरांसाठी दरवाजाला दोन भोकं करणाऱ्याची आहे; एक लहानासाठी व दुसरं मोठ्या मांजरासाठी. तुमचं लक्ष्य बरोबर आहे. मार्ग मात्र इतरांच्या सल्ल्यानं ठरवा. लोकांबरोबर वाद घालण्याचं टाळा!'' त्या उपदेशानं जशा मला माझ्या मर्यादा दाखवल्या, तसा दिलासाही दिला आणि पुढील प्रवासाचा मार्गही दाखवला.

खानदेशच्या दौऱ्यावर माझी पत्नीही बरोबर होती. नंदूरबारच्या सार्वजनिक वाचनालयाच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवा-साठी वर्षभर चाललेल्या मासिक व्याख्यानमालेत माझे विचार मांडण्यासाठी वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. पितांबर सरोदेंनी मला निमंत्रित केलं होतं. जोडीला जळगाव, धुळे इथेही कार्यक्रम ठरले होते. धुळ्याच्या डॉ. मु.ब. शहांची आणि माझी प्रत्यक्ष ओळख नव्हती. तरीही, ''हॉटेल वगैरे नको, आमच्या घरीच राहा.'' असं आगत्याचं निमंत्रण होतं.

जळगावला मुख्य कार्यक्रम होता तो भवरलाल जैन ह्यांना भेटण्याचा. त्या दिवशी सकाळी एका महत्त्वाच्या कारणानं भवरलालजी कारखान्यातच गुंतून पडले. उशीर झाल्यामुळे त्यांच्याबरोबर 'कौटुंबिक' जेवणाचा आनंद घेता आला. लेख आवडल्याचं त्यांचं पत्र आधीच आलेलं होतं, मुख्य चर्चा होणार होती ती पुढील कारवाईच्या अनुषंगानं.

भोजनोत्तर चर्चेला सुरुवात झाली. दबावनिर्मितीच्या कृतीवरील चर्चेत, 'देशातील सत्शक्ती एकत्र आली पाहिजे' हा माझा प्रस्ताव होता. त्यासाठी एका मेळाव्याची गरज मी व्यक्त करताच जैनांनी आपल्या स्वीय सचिवांना, उदय महाजनांना बोलावलं व त्या मेळाव्यासाठी मला काही मदत लागली तर ती देण्याची व्यवस्था करण्याचं सांगून, तो मेळावा जर जळगावला घेता आला तर अतिथिगृहाचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी त्यांनाच घेता येईल, हे व्यक्त केलं.

पुढील दौरा होता विदर्भाचा. लोकमतचे संपादक प्रा. सुरेश द्वादशीवार ह्यांच्याकडे मला ॲड. सचिन पंचभाई ह्यांनी नेलं होतं. त्यांच्याबरोबरचा हा अनुभव आजच्या समाजाच्या मानसिकतेवर झकास प्रकाश टाकतो. लोकशाहीमूल्यांचा अभाव असणाऱ्या व मानसिकतेत संरजामशाही मुरलेल्या आपल्या समाजातील बहुसंख्याकांच्या मनात माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीला लाभणाऱ्या स्थानाचं भान मला यावं म्हणून द्वादशीवारांनी मला काही प्रश्न विचारले. त्या प्रश्नांसाठी पार्श्वभूमी तयार करताना ते असंही म्हणाले होते, ''राग मानू नका, पण तुमच्या ह्या महाराष्ट्र दौऱ्यासंबंधात जनतेला काय वाटतं, हेही महत्त्वाचं. ते सहन करून पुढे जाण्यासाठी तुमच्या मनाची तयारी असली पाहिजे, त्यांच्या प्रश्नांना तुमच्यापाशी उत्तरं पाहिजेत.'' मी तर हबकलोच. परंतु, नंतर त्यांनी दिलेली प्रश्नांची यादी अधिक धक्कादायक होती. ''कोण तुम्ही, कुठले? तुमच्याबद्दल काहीच वाचलेलं नाही, बघितलं नाही. आजवर कोणाचं नेतृत्व केलंत? आम्ही तुमचं का ऐकावं? तुम्ही ना पुढारी ना मंत्री, ना कुठले अधिकारी, हक्क काय तुमच्यासारख्या सामान्य माणसाला ह्या विषयावर बोलण्याचा?'' असा त्या यादीतील प्रश्नांचा मथितार्थ होता.

लोकशाहीत सामान्य माणूसच राज्यकर्ता असतो, त्याला स्वत:च्या हक्कांचं व जबाबदाऱ्यांचं भान असलं पाहिजे, वगैरे गोष्टी मानायलाच आम्ही तयार नसतो. आमचे प्रश्न सोडवण्यासाठी स्वत:च पुढाकार घेण्याऐवजी, शासन-प्रशासनावर टीका करणंच आम्हाला आवडतं. लोकशाहीची तत्त्वं आम्हाला अनाकलनीय असतात. कोणीतरी करणार, सांगणार - आम्ही ऐकणार. त्या सांगणाऱ्याला मात्र आमच्या धारणेत काहीतरी 'स्थान' असलं पाहिजे. एखादी सामान्य व्यक्ती म्हणजे आपल्या-सारखी प्रजा आणि 'स्थाना'वरून सांगणारा तो 'राजा', हीच आज आपल्या समाजाची-संरजामशाहीची-मानसिकता असते.

दोन माजी न्यायमूर्ती आणि एक माजी मंत्री ह्या जनसंपर्कात मला भेटले. त्या तिघांबरोबरच्या चर्चेचा अनुभव सारखा असूनही वेगळ्या पद्धतीचा होता. सुरुवातीला मात्र मला वाटलं, की त्या तिघांचाही रोख मला अजमावण्याचा होता.

औरंगाबादला न्यायमूर्ती चपळगावकरांकडे गेलो तेव्हा माझ्याबरोबर डॉ. सतीश राजमाचीकर होते. आम्ही आसनस्थ होत नाही तर माझ्या लेखाची प्रत व आधी प्रकाशित झालेली माझी पुस्तकं घेऊन चपळगावकर त्यांच्या घरातील ऑफिसमध्ये आले. बसता-बसता म्हणाले, ''लेख काही मी पूर्ण वाचलेला नाही, काय म्हणायचंय तुम्हाला?'' मी सावरून बसलो. माझी भूमिका, विचार व प्रस्ताव मांडत असताना चर्चेला कधी सुरुवात झाली, कळलंच नाही; आणि झालेल्या चर्चेवरून असंही वाटलं नाही की चपळगावकरांनी माझा 'काळाची गरज' हा लेख नीट वाचला नव्हता.

मुंबईला न्यायमूर्ती धर्माधिकारी ह्यांच्या दिवाणखान्यात मी दोन-चार मिनिटं बसलो असेन, तोच पॅड, पुस्तकं व पेन्स घेऊन न्यायमूर्ती आले. औपचारिक ओळखीनंतर त्यांनी प्रश्न केला, ''तुमचा रोख आहे नागरिकत्वावर. नागरिकत्व म्हणजे काय व भारताच्या भावी नागरिकांकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत? उद्याचा नागरिक घडवायचा म्हणता, तो कसा असावा?'' अशा उलट तपासणीला माझी तयारी नव्हती. एक आवंढा गिळला आणि नागरिकत्वाच्या माझ्या अपेक्षा मांडल्या. त्यांच्या साहाय्यकाला धर्माधिकाऱ्यांनी हाक मारली व सांगितले, ''भारताच्या राज्यघटनेची मराठी आवृत्ती पाठवा.''

नि:शब्द शांतता! आवृत्ती आली. उघडून वाचण्यापूर्वी थोडंसं खाकरून धर्माधिकारी म्हणाले, ''तुमच्या अपेक्षा घटनेतील व्याख्येशी जुळतात, वाचतोच मी.'' त्यानंतर तात्त्विक मुद्दे मांडले गेले, बुजुर्गांचे दाखले सादर झाले, अवतरणं उद्धृत

केली गेली, गप्पा रंगल्या.

पुण्याच्या भाई वैद्यांच्या घरी गेलो होतो. एका कोचावर मी व समोरच्या कोचावर भाई, जणू काही 'आमने-सामने'च. जुजबी प्रश्नोत्तरांनंतर वैद्य म्हणाले, ''बोला.'' माझ्या एकतर्फी कथनाला सुरुवात झाली! अधुनमधून हुंकार, मान डोलावणं, भुवया उंचावणं, मंद हास्य एवढाच मुका प्रतिसाद! पंधराएक मिनिटांनंतर पहिला प्रश्न आला. ''काय व्हायला पाहिजे हे उमजलं. पण, ते कसं साधणार?'' मग मात्र तासभर चर्चा झाली, निघताना भाईंनी पुढील संपर्कासाठी नावं आणि पत्ते पण दिले.

पक्षातील एखादा वरिष्ठ नेता मोकळेपणानं बोलतो, पण त्याच विचारपठडीतील कार्यकर्ता मात्र आडमुठा भासतो. असे अनुभव बऱ्याचदा आले. कार्यकर्त्यांची मनं बंदिस्त भासतात, नवीन विचारांशी जुळवून घेणं त्यांना कठीण जातं. ह्या संदर्भात नागपूरच्या मा.गो. वैद्यांबरोबर झालेला संवाद बरंच काही सांगून जातो; बदलासाठी कोणाबरोबर बोलायचं, तो मार्ग दाखवतो.

वैद्यांची अन् माझी पहिली भेट प्रवासात, रेल्वेगाडीत झाली. प्रत्यक्ष ओळख नव्हती, पण पत्रव्यवहार चालू होता. प्रतिक्रियेसाठी मी त्यांना माझा लेख पाठवला होता. नागपूरहून गाडी सुटल्यावर वैद्य दांपत्य बसलं होतं तिथे मी गेलो व ओळख करून घेतली. वैद्य म्हणाले, ''थोडं लिहायचं आहे, उद्या सकाळी सविस्तर बोलू.'' उभ्या-उभ्याच मी जागेवर परतलो.

अर्धा-एक तास गेला असेल, वैद्य मला शोधत आले व समोरच्या बाकावर स्थानापन्न झाले. मी पत्नीची ओळख करून दिली व उघडलेली कागदपत्रं आवरू लागलो. ''फार हलतेय गाडी, लिहायला जमत नव्हतं; म्हटलं तुम्ही मोकळे असाल तर बोलुया.'' वैद्य आरएसएसचे, कट्टर हिंदुत्ववादी, तरुण भारतचे माजी संपादक आणि माझा लेख तर धर्मनिरपेक्षतेचं महत्त्व पटवणारा. परंतु, ती बाब चर्चेच्या आड आली नाही. सुजाण नागरिकत्वाच्या जोपासनेसाठी शालेयशिक्षण देण्याच्या माझ्या प्रस्तावाला वैद्यांचा विरोध जाणवला नाही. कार्यकर्त्यांच्या बंदिस्त विचारांबाबत मी जेव्हा विचार व्यक्त केले तेव्हा वैद्य म्हणाले, ''तुम्ही उद्योगजगतात वरिष्ठ हुद्यावर काम केलं आहे. कंपनीची, खात्याची काही धोरणं असतात, विचारसरणी असते. त्यानुसार, काम करणाऱ्यांचे विचार पक्के होतात, पद्धती ठरतात, अंगी शिस्त बाणली जाते. एखादा नवा विचार व पद्धतीतील बदल अशा विषयांवर जर मी तुमच्या खात्यात काम करणाऱ्या व्यक्तींबरोबर चर्चा करायला गेलो तर मला काय अनुभव येईल?''

मी निरुत्तर झालो.

विविध स्तरांतील, विविध क्षेत्रांतील अनुभव जरी व्यक्तिसापेक्ष असले तरी त्यांत काही साधर्म्य होते. संस्थाप्रमुख (एनजीओवाले) वेगळे, राजकारणी वेगळे, माध्यमं, प्राध्यापक हे सुद्धा निरनिराळे गट. मात्र, ह्या सर्व गटांतील बहुतेकांना प्रस्तुत सामाजिक विषय जिव्हाळ्याचा, आपला वाटला. अपवाद होते, पण अन्य क्षेत्रांतील; विशेषत: उद्योगांत वा इतरत्र गुंतलेल्या व्यावसायिक व्यक्तींना मात्र प्रस्तुत विषयाशी आपला काही संबंधच नाही, असं वाटायचं. (हेसुद्धा तितकंच खरं, की काही वर्षांपूर्वी मी स्वत:सुद्धा हीच भावना बाळगली होती.)

अशाही काही व्यक्ती होत्या, विशेषत: प्रशासनातल्या, ज्या काहीही मत व्यक्त करायला तयार नव्हत्या. विविध धार्मिक नेतृत्वाचेही विशिष्ट अनुभव नोंद घेण्यासारखे आहेत. सर्व धर्मांच्या विचारवंतांना ते साधारणत: लागू पडतील आणि बहुतांश चर्चांमध्ये मला ते जाणवले. पहिली गोष्ट म्हणजे धर्मासंबंधातील मुद्यांवर ते इतर धर्मीयांतील विचारवंतांबरोबर चर्चा करायला उत्सुक नसायचे. मी मांडलेला प्रस्ताव बहुतेकांना पटायचा. धार्मिक कोतेपणा दूर व्हावा असंही त्यांना वाटायचं. परंतु, काही उपाययोजना करायची असेल तर त्या गोष्टीची जास्त गरज इतर धर्मीयांना आहे, असं व्यक्त व्हायचं.

असेही काही भेटले, की ज्यांना समाजबांधणी, उत्क्रांती ह्या गोष्टी स्वाभाविक, नैसर्गिक प्रक्रिया वाटतात; करू म्हटल्याने काही होतं नसतं. यावर त्यांचा प्रामाणिक विश्वास असतो.

बहुतेक व्यावसायिक मात्र, मग ते कोणत्याही क्षेत्रांतील असोत, स्वत: निवडलेल्या कामांत रममाण असायचे. त्यांना माझ्या प्रस्तावासंबंधातील विषयात, वेळेअभावी, रस घेणं शक्य नसायचं!

समाजसुधाराचे अनेक प्रकारचे प्रयत्न करून अनेकांनी हात टेकलेले असतात; त्यामुळे काही उद्विग्न असतात, तर काही विफल. अशांना मवाळ मानता येईल. धारदार टीकाकार वा जहाल क्रांतिकारी विचारांचे लोकही असतात. त्यांच्या प्रयत्नांतून बलाढ्य शत्रू निर्माण होतात. मात्र ते जेव्हा हरतात तेव्हा त्या शत्रूंकडून एक तर ते खरेदी केले जातात वा त्यांना सोन्याच्या पिंजऱ्यात अडकवले जाते; काहींची तर बोलतीच बंद केली जाते. एकूण काय, तर ही मवाळ वा जहाल, दोन्ही मंडळी समाजसुधाराच्या कोणत्याही उपक्रमांपासून दोन हात दूर राहतात. भविष्याच्या दृष्टिकोनातून असे गट समाजात तयार होणं फार भयावह आहे, असं मला वाटतं.

कोकणातील शीमोशी हे एक छोटं आडगाव, ओणी आणि लांजा ह्यांच्या-जवळचं, एक खेडंच. तिथे व्यवस्थापन-शास्त्राचं एक महाविद्यालय आहे. त्या महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यां-करता एक संपर्क-कार्यक्रम आयोजला होता. विद्यार्थी, अन् तेसुद्धा व्यवस्थापनशास्त्राचे, म्हणून विचार सादर करण्याकरता मी 'प्रॉब्लेम सॉल्व्हिंग टेक्निक' (समस्या निवारणार्थ उपाय शोधण्याची पद्धत) वापरायचं ठरवलं. तास-दीड तासाच्या प्रात्यक्षिकातून मला ते टेक्निक विद्यार्थ्यांना शिकवण्याचंही समाधान मिळालं आणि मुख्य म्हणजे झालेल्या चर्चेतून मी निवडलेल्या पर्यायाकडे विद्यार्थ्यांची होणारी वैचारिक वाटचाल बघून

आनंदही झाला.

उपरोक्त पद्धत नंतर मी बऱ्याच गटांसाठी वापरली. उदाहरणार्थ, वेंगुर्ला येथील ॲडव्होकेट परुळेकरांनी आयोजित केलेली सभा, औरंगाबादचं भगिनी मंडळ, अहमदनगरचा सोशल सर्व्हिस कॅम्प, मुंबईतील वैद्यकीय पदवीधरांचं शिबीर, घाटकोपर येथील रोटरी क्लब वगैरे. आज तर इ-मेलवरील प्रचारासाठी मी त्याच तंत्राचा वापर करतो. समस्यानिवारणतंत्र वापरलेल्या अशा सभांच्या उदाहरणांवरून हे टेक्निक सर्व प्रकारच्या गटांसाठी उपयुक्त आहे त्याचीही कल्पना येईल. विचार पटवून देण्यासाठी हे टेक्निक मला खूप उपयुक्त वाटतं. ह्या गोष्टीचं मुख्य कारण म्हणजे एकतर्फी प्रबोधनाऐवजी ह्या पद्धतीनं समोरच्यांना वैचारिक प्रक्रियेत सहभागी करून घेता येतं. वैचारिक देवघेवीतून उपाययोजना विकसित होते, संपूर्ण गटाला आपली वाटते आणि विरोधाकरता होणारा विरोध टाळला जातो.

गडचिरोलीला सभा आयोजित करणार होते चंद्रशेखर भडांगे. त्यांचं नाव सुचवलं होतं कुरखेड्याच्या डॉ. सतीश गोगुलवारांनी. भडांगे ह्यांनी चर्चेसाठी जी वेळ निवडली होती ती तुकडोजी महाराजांच्या जयंती समारंभानंतरची आणि बैठकीत सहभागी होणारे लोक होते ते त्या प्रसंगासाठी जमलेल्यांतीलच काही व्यक्ती. प्रतिसादाबद्दल मी साशंकच होतो, पण अनुभव मात्र निराळा आला. त्यांना पटलेल्या माझ्या विचारांच्या समर्थनार्थ तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील अनेक संदर्भ ओव्यांच्या स्वरूपात व्यक्त झाले व त्या ग्रामगीतेची एक प्रत मला भेट म्हणून मिळाली. आस्तिकतेचा, अध्यात्माचा समाजावर असलेल्या एका निराळ्या प्रभावाचं भान मला आलं.

सर्व क्षेत्रांत अशाही काही व्यक्ती असतात की त्या तुम्हाला प्रोत्साहित करतात. कामाचं महत्त्व त्यांना उमगलेलं असतं व कार्य पुढे रेटण्यासाठी ते तुम्हाला उत्तेजन देत राहतात. त्यांच्या विश्वासावर तुम्ही पुढे जाता; तुमची अपेक्षा असते की सुरू करायच्या कामात त्यांचं सक्रिय साहाय्य तुम्हाला लाभेल. पण, तसं होत नाही. हळुहळू ते उपक्रमातून अंग काढून घेतात. तसं होण्यामागे कारणं व्यक्तिसापेक्ष असू शकतात; पण तुमचा स्वत:चा मात्र भ्रमनिरास होतो. मी स्वत: मात्र अशा अनुभवांतून हताश होत नाही. कारण, काम सुरू केलेलं असतं ते स्वत:ला पटलं असतं म्हणून. उलट, मी असं मानतो की त्या व्यक्तीनं जोर केला नसता, तर कदाचित कामालाच सुरुवात झाली नसती! मी मनात त्या व्यक्तीचे आभार मानतो. मात्र, अशा व्यक्तींच्या साहाय्या-शिवाय पुढे जायचं का नाही, हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं.

विविध प्रकारच्या विचारसरणींच्या लोकांशी माझा 'जनसंवाद'च्या माध्यमातून संबंध येतो. वय, व्यवसाय, अनुभवाचं क्षेत्र वगैरे गोष्टींचा प्रभाव असतोच. ते व्यक्तिसापेक्षसुद्धा असतात. त्यांत दोन्ही प्रकारचे लोक असतात; विचार पटणारे व न पटणारे. ज्यांना विचार पटतात त्यांच्या-बरोबरच्या पुढील संपर्कातून मानवी स्वभावाचे बरेच पैलू अनुभवास आले. त्यांतील एक पैलू, संदर्भात फार महत्त्वाचा वाटतो. तो आहे औपचारिकरीत्या 'जनसंवाद'चे सदस्य होण्याबाबतचा.

हेतू पटले आहेत, उपक्रम स्तुत्य आहे, पण काहीतरी ठोस कामाची जबाबदारी घेऊ शकणार नसू तर सदस्य कसं व्हायचं? हा एक विचार झाला. दुसरा गट असतो तो उत्साही लोकांचा. ते कोणाच्यातरी सांगण्यावरून, फार विचार न करता लागलीच सदस्य होण्यासाठी अर्ज करतात व सोयीस्कररीत्या नंतर विसरून जातात. तिसराही एक प्रकार असतो. त्या पैलूचं उदाहरण देऊन लेखाचा समारोप करतो.

हैदराबादहून 'जनसंवाद'ची बैठक आटोपून परतत होतो. आरक्षण बरंच आधी केल्यामुळे मला व पत्नीला, दोघांनाही, वृद्ध नागरिक म्हणून खालचे बर्थ मिळाले होते. गाडी सुटायची वेळ होता होता आमच्या-हूनही वयस्क असणारं एक जोडपं केबिनमध्ये आलं. मला वाटलं, आता ह्यांच्यापैकी जर कोणी विनंती केली तर, वयाचा विचार करून मला बहुतेक वरच्या बर्थवर जावं लागणार. परंतु तसं काही झालं नाही; ॲटेंडंटनं बिछाने लावल्यानंतर आपापल्या शिड्या वापरून ते दोघंही वरच्या बर्थवर गेले.

सकाळी नाश्ता झाल्यावर नेहमी-सारखी औपचारिक ओळख व गप्पांना सुरुवात झाली. आपापले व्यवसाय व निवृत्तीनंतरच्या व्यस्ततेबद्दल बोलताना मी त्यांना 'जनसंवाद'च्या कामाची व उद्दिष्टांची कल्पना दिली आणि 'जनसंवाद'चं माहिती-पत्रकही दिलं. आम्ही पुण्याला उतरताना पत्ते-फोन वगैरेंचीही देवाणघेवाण झाली. ते पुढे मुंबईला जाणार होते. गृहस्थाचं नाव होतं श्रीधर चेंबूरकर. प्रवासातली गाठभेटच ती, मला वाटलं ती तिथेच संपली.

पंधरा दिवसानंतर चेंबूरकरांचं पत्र आलं. मला आश्चर्यच वाटलं. उघडून बघतो तर सोबत एक हजार रुपयांचा धनादेश. पत्रात लिहिलं होतं की ते 'जनसंवाद'चे सदस्य होऊ इच्छितात, मात्र वयानुरूप विशेष काम त्यांच्याकडून होणार नाही. पाठीराख्यांचं संख्याबळही चळवळीला उपयुक्त असतंच. जमेल तेवढा तोंडी प्रचार ते करतील हे आश्वासन त्यांनी आधीच दिलं होतं.

चेंबूरकर ही व्यक्ती मला जाणवलेल्या त्या तिसऱ्या पैलूचं उदाहरण मानता येईल. अशांना मी खरे व्यावसायिक मानतो. भीड नाही, लाज नाही, मुरवतीखातर कधीही काही करणार नाहीत. स्वत:च्या मर्यादा ओळखणारा आणि वैचारिक अनिश्चिततेचा घोळ (पोक्रास्टिनेशन) टाळणारा, समोरच्याची अपेक्षा न वाढवता करता येईल तेवढं साहाय्य करणारा, पटेल त्या विचारांची बांधिलकी मानणारा, असा हा तिसरा पैलू!

**– सु.गो. तपस्वी**
समन्वयक, जनसंवाद
suhas@fandsindia.com
९७६६१५२२५३

**'अंधश्रध्दा निर्मूलन : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम'**
**या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभातील मान्यवरांचा सूर**

# गरज धार्मिक-सांस्कृतिक निष्ठांतराची!

**प्रा. तुकाराम यादव**

जात हीच एक मोठी अंधश्रध्दा आहे. ही अंधश्रध्दा नष्ट करण्यासाठी ज्या धर्म-व्यवस्थेवर जात आरूढ आहे आणि ज्या सांस्कृतिक निष्ठांवर धर्म उभा आहे त्या धर्मव्यवस्थेवर आणि सांस्कृतिक निष्ठांवर प्रहार करायला हवा. अंधश्रध्दा निर्मूलनाच्या आणि एकूणच परिवर्तनाच्या चळवळीकडून हे अपेक्षित होते. तथापि त्यांच्याकडून हे झाले नाही. संदीप जावळे यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून अंधश्रध्दांच्या मुळावरच घाव घालण्याचा आणि चळवळीची भूमिका योग्य दिशेने नेण्याचा प्रयत्न केला आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत तथा साहित्यिक लक्ष्मण माने यांनी केले.

संदीप जावळे लिखित आणि ग्रंथाली प्रकाशित 'अंधश्रध्दा निर्मूलन : प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी यांच्या हस्ते दादर येथील धुरू हॉलमध्ये झाले त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून लक्ष्मण माने बोलत होते.

बहुसंख्य पुरोगामी मंडळी चळवळीत, आंदोलनात, तुरूंगात एकत्र राहतात परंतु कृतीच्या आणि कसोटीच्या क्षणी स्वीकृत भूमिकेला बगल देतात. वैचारिक भूमिका निधर्मी असल्याचे सांगतात परंतु सांस्कृतिक निष्ठा हिंदूच ठेवतात. ही विसंगती परिवर्तनाची चळवळ यशस्वी करू शकत नाही. हे लक्षात घेऊन परिवर्तनवाद्यांनी आपल्या सांस्कृतिक निष्ठा बुध्दाशी जोडून जातीनिर्मूलनाची चळवळ गतिमान केली पाहिजे. सर्वच प्रकारच्या जातीपातींचे उच्चाटन करण्याची भूमिका घेतली पाहिजे. 'व्यवस्था परिवर्तन' हा आपला कार्यक्रम असला पाहिजे. त्याचाच एक भाग म्हणून बुध्दाचा वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून देव, धर्म, स्वर्ग, नरक, आत्मा, परमात्मा अशा खुळचट अंधश्रध्दांतून बाहेर पडले पाहिजे. बौध्द धम्म ही समतेवर आधारित विज्ञानाधिष्ठित जीवनसरणी आहे. सारासार विचार करणारी कोणतीही व्यक्ती बौध्दच असते आणि बौध्द धर्माचाच मार्ग चालत असते. बौध्द धर्म स्वीकारण्यासाठी बौध्दा-चार्यांनीच दीक्षा दिली पाहिजे याची गरज नाही. कुठलाही सर्वसामान्य बौध्द माणूस दुसऱ्या माणसाला बौध्द धर्माची दीक्षा देऊ शकतो. प्रगत जीवन जगणारा अभिजनवर्ग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गावरून चालणारा आंबेडकरी समाज यांच्यात अनेक मान्यवरांमुळे विचारचक्रे फिरली. पण मधल्यांचे, ओबीसींचे काय? खैरलांजी हत्याकांडात असलेला ओबीसींचा सहभाग पाहता धर्म आणि जाती यांचा पगडा घालविण्यासाठी अद्याप किती वाटचाल करायची आहे हे स्पष्ट होते. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठीची महाराष्ट्रातली पहिली परिषद आम्ही घेतली त्यावेळी ओबीसींचे प्रतिनिधी काय करत होते? आजतरी ते परिवर्तनाच्या बाजूचे आहेत काय असा सवाल माने यांनी उपस्थित केला.


प्रतिगामी मंडळींनी प्रतिगामी भूमिका घेतल्या तर ते समजू शकते. किंबहुना म्हणूनच त्यांना आपण प्रतिगामी म्हणतो. ते आपले उघड शत्रू असतात. परंतु पुरोगामी आणि परिवर्तनवादी म्हणविणारे मित्रच ज्यावेळी धार्मिक-सांस्कृतिक बाबतीत अनाकलनीय भूमिका घेतात तेव्हा त्याला दांभिकपणाच म्हणावे लागते. तीन वर्षापूर्वी लाखो अनुयायांसह आम्ही बौध्द धर्मात प्रवेश केला. त्यावेळी अनेक पुरोगामी मित्रांना माझे हे पाऊल आवडले नाही. परंतु त्याची मी फिकीर केली नाही. आपण एकेकटे पेटलो तरच मोठा प्रकाश निर्माण होणार आहे. आपणच कच खाल्ली तर परिवर्तन अवघड होऊन बसेल. नुसत्या भाषणांचा काही उपयोग नाही. आज लाखो भटक्याविमुक्तांच्या आयुष्यात आमूलाग्र परिवर्तन होऊ घातले आहे. महाराष्ट्रात दरवर्षी तीनचार ठिकाणी लाखोंच्या संख्येने भटक्याविमुक्तांच्या यात्राजत्रा भरत असत. या जत्रा दीडदोन महिने चालत. तिथे बेसुमार पशूहत्या होत असे. इतर अनेक अंधश्रध्दांना आणि चालीरीतींना खतपाणी मिळत असे. बौध्द धर्म स्वीकारल्यापासून गेल्या तीन वर्षात दीडदीड महिना चालणाऱ्या या जत्रा तीन दिवसांवर आल्या आहेत. आणखी सातआठ वर्षात त्या पूर्ण बंद होतील यात शंकाच नाही. हे परिवर्तन आहे. बौध्द धर्म स्वीकारल्यामुळेच हा बदल होतो आहे.

अन्यथा तो झाला नसता, असे मतप्रदर्शन माने यांनी केले.

पत्रकार प्रतिमा जोशी यावेळी म्हणाल्या, ‘अंधश्रध्दा निर्मूलन: प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम’ या पुस्तकाची भाषा तिखटजाळ आणि आक्रमक असली तरी प्रतिपादन नि:संदिग्ध आहे. समाज-जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील नेतेमंडळी जातपात/बुवाबाजी या अंधश्रध्दांच्या विरोधात उभे राहतील आणि आपल्याच खुर्च्यांखाली जाळ पेटवून घेतील अशी अपेक्षाच करणे फोल आहे. इथल्या बहुसंख्यांकांच्या मनात उच्चनीचतेची उतरंड जोपर्यंत शिल्लक आहे तोपर्यंत धार्मिक आवरणाखाली अंधश्रध्दांचेही राजकारण केले जाणार हे ध्यानात घेऊनच अंधश्रध्दांविरोधी चळवळ पुढे न्यावी लागेल. आज बाबा-बुवा-बापूंच्या आश्रमात अध्यात्माच्या नावाखाली अनेक गैरप्रकार चालले आहेत. स्त्रियांवर अत्याचार होत आहेत. याविरूद्ध आवाज उठविला जाण्याची नितांत गरज आहे.

पत्रकार युवराज मोहिते यांनीही याप्रसंगी आपले विचार मांडले. ते म्हणाले, आज अनेक प्रकारचे नवनवे बाबा येत आहेत. उच्च वर्ग, उच्चमध्यम वर्ग आणि मध्यमवर्ग यांना या भोंदू बाबांनी अक्षरश: भुरळ घातली आहे. एका बाबाकडे तर एम.बी.ए. झालेले दीडशे लोक काम करतात! अनेक चॅनेल्सवर हे बाबा भंपक प्रवचने देत असतात. त्यासाठी चॅनेल्सवरच्या महत्त्वाच्या वेळा लाखो रुपयांना विकत घेतात. अंधश्रध्दांचे आणि बुवाबाजीचे स्वरूपच आज बदलले आहे. या बदललेल्या परिस्थितीला आपण कशा प्रकारे तोंड देणार, हे सगळयात मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. या पार्श्वभूमीवर हे पुस्तक आले असून अंधश्रध्दा निर्मूलनाची गोची का झाली याची उघडपणे कारणमीमांसा त्यात केलेली दिसते. परिवर्तनाची ठाम भूमिका घेऊन हे पुस्तक उभे राहिले असून अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीची कोंडी फोडण्याचे आणि चळवळीला नवी दिशा देण्याचे काम ते नक्कीच करील असा विश्वास वाटतो.

पुस्तकाचे लेखक संदीप जावळे आपले मनोगत मांडताना म्हणाले, अशिक्षित लोकांपेक्षा शिकलेल्या आणि स्वत:ला सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांमध्येच अंधश्रध्दांना उधाण आल्याचे आपण पाहतोय. विविध प्रकारची कर्मकांड, मंत्रतंत्र, जपजाप्य, व्रतवैकल्यं, जारणमारण, अग्निहोत्र, होमहवन, वास्तुशास्त्र अशा अनेक गोष्टी आज जोरात सुरू आहेत. सत्यनारायण तर एकदम फॉर्मात आहे! हा सत्यनारायण कोण? त्याची जन्मतारीख काय? त्याचे सरकारी कार्यालयात काम काय? भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षता स्वीकारली आहे. त्याचा अर्थ शासनप्रशासन धर्माच्या आणि धार्मिक पूजाअर्चांच्या बाबतीत पूर्ण निरपेक्ष असणे, अलिप्त असणे! परंतु आजकाल २६ जानेवारीच्या म्हणजेच संविधानदिनाच्या मुहुर्तावरच या पूजाअर्चा आयोजित करण्याचे लोण आले आहे. हे म्हणजे हेमंत करकरेंच्या जयंतीला कसाबचा नाच ठेवण्यासारखे आहे! अंधश्रध्दा संपल्या पाहिजेत, समाज बुध्दिवादी झाला पाहिजे असे आपण सगळेच म्हणतो. परंतु प्रत्यक्षात त्यासाठी नीट आणि नेमकेपणाने प्रयत्न करत नाही. चळवळीही खोलात जाऊन विचार करत नाहीत. ही मंडळी वरवरच्या


# प्रवर्तन

**संदीप जावळे**

केवळ धर्म बदलल्यामुळे मानवी मनाचा मूलभूत दृष्टिकोनच बदलत असेल तर धर्मांतर हे परिवर्तनाच्या प्रश्नाचे निश्चितच मूलभूत उत्तर ठरते!

**मूल्य : १२० रुपये**
**सवलतीत : ७० रुपये**

फांद्यांवर लक्ष देतात, मुळापर्यंत जात नाहीत. हिंदू/मुस्लिम/ख्रिश्चन या समाजांमध्ये ज्या अंधश्रध्दा आढळतात त्या अंधश्रध्दांचे मूळ आहे त्यांच्या धार्मिक तत्त्वज्ञानात, धार्मिक संस्कारात आणि धर्माच्या मूळ श्रद्धेमध्ये! हे धर्म विज्ञाननिष्ठा शिकवत नाहीत. उलट ग्रंथप्रामाण्य/शब्दप्रामाण्य शिकवतात. त्यामुळे अंधश्रध्दावादी प्रवृत्तीला धार्मिक प्रेरणा आणि पाठबळ मिळते. अंधश्रध्दांचे खऱ्या अर्थाने निर्मूलन करावयाचे असेल तर अंधश्रध्दाळू मानवी वृत्तीला आणि अंधश्रध्दांना धर्माकडून खतपाणी मिळणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. अगतिक/असहाय असल्यामुळे माणूस भलेही अंधश्रध्दांच्या आश्रयाला जाईल. परंतु धर्माने त्याला तसे जाऊ देता कामा नये. माणसाला सातत्याने चांगल्या जीवनप्रेरणा देणे आणि प्रगल्भ मार्गावर ठेवणे हेच तर धर्माचे काम आहे ना? शेवटी धर्म आहे कशासाठी असा प्रश्न त्यांनी केला.

चारपाच टक्के अतिनिर्भय/असामान्य पुरोगामी मंडळींची गोष्ट वेगळी असते. ९५ टक्के सर्वसामान्य लोकांचा समाज मात्र आपापल्या धार्मिक श्रध्दांच्या परीघातच विचार करतो, त्या वर्तुळातच घुटमळतो, त्या धर्मश्रध्दांशीच निष्ठावान राहतो. त्यामुळे बुध्दिप्रामाण्याला वाव नसणाऱ्या धर्मात जो माणूस असतो त्याच्या धर्मश्रध्दांचा कल बुध्दिप्रामाण्याला वाव न देण्याकडे असतो. म्हणून तर बुध्दिप्रामाण्य म्हटले की हिंदू/मुस्लिम/ख्रिश्चन धर्मातली माणसं कान टवकारतात, आपल्या धर्माविरूद्ध काहीतरी आहे असा समज करून घेतात आणि विरोधात उभी ठाकतात. अंधश्रध्दा निर्मूलनासाठी आपण प्रबोधन आणि चळवळी करतो परंतु त्याचा फारसा फायदा होत नाही. कारण बहुसंख्य समाजाच्या मूलभूत धार्मिक-सांस्कृतिक श्रध्दा बुध्दिप्रामाण्यविरोधी असून त्या श्रध्दांशी त्यांच्या मानसिक निष्ठा जोडलेल्या आहेत. कृतीच्या आणि कसोटीच्या वेळी या निष्ठा इतर सर्व निष्ठांवर मात करतात. अंधश्रध्दा निर्मूलनासमोर हाच मुख्य आणि मूलभूत अडसर आहे. त्यामुळे बुध्दिप्रामाण्यविरोधी धर्माशी असलेल्या त्यांच्या निष्ठा तोडण्याची आणि त्या बुध्दिप्रामाण्यवादी धर्माशी जोडण्याची गरज आहे. बुध्दिप्रामाण्य हीच माणसाची मुख्य धार्मिक-सांस्कृतिक निष्ठा केली की अंधश्रध्दा निर्मूलनाचे काम सोपे आणि सुसंगत झाल्याशिवाय राहणार नाही, असे जावळे यांनी सांगितले.

अशा रंगतदार वैचारिक मेजवानीनंतर लोकशाहीर संभाजी भगत यांनी बहारदार गाणी गाऊन कार्यक्रम सुरांच्या दुनियेत नेला. तत्पूर्वी प्रारंभी ग्रंथालीचे अरुण जोशी यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. ग्रंथालीचे विनायक गोखले यांनी उपस्थितांचे आभार मानले. कविता मोरवणकर यांनी सुंदर सूत्रसंचालन केले.

**– प्रा. तुकाराम यादव**


# अंधश्रद्धा निर्मूलन

**प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम**

**– संदीप जावळे**




गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ या विषयाशी व चळवळीशी संबंधित असलेल्या लेखकाचे हे पुस्तक सर्वच अंधश्रद्धांचे अत्यंत निर्णायक, सडेतोड चर्चा करणारे मराठीमधील पहिलेच पुस्तक!

**मूल्य : १२० रुपये**
**सवलतीत : ७० रुपये**